मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर-ठाणे | रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | शुक्रवार, ९ मे २०२५ | वर्ष: ११ | अंक: १६९ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## पाकिस्तानच्या सर्व कंटेंटवर भारतात बंदी - केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली, दि. ८ प्रतिनिधी**

भारत पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पाकिस्तानात तयार होणाऱ्या सर्व प्रकारच्या डिजिटल कंटेंटवर बंदी घालण्याचे आदेश केंद्राने दिले आहेत. केंद्र सरकारने ओटीटी, मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मना महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशात, "भारतातील सर्व ओटीटी प्लॅटफॉर्म, मीडिया स्ट्रीमिंग सेवा आणि भारतात कार्यरत असलेल्या मध्यस्थांना निर्देश देण्यात आले आहेत. सबस्क्रिप्शनआधारित मॉडेल्सद्वारे किंवा इतर कोणत्याही प्रकारे ऑफर केलेले पाकिस्तानी वेब सिरीज, चित्रपट, गाणी, पॉडकास्ट आणि पाकिस्तानमधून येणारे इतर स्ट्रीमिंग कंटेंट ताबडतोब बंद करण्यास सांगितले आहे." "राष्ट्रीय सुरक्षेच्या हितासाठी" हा निर्णय घेण्यात आला आहे, असे अधिसूचनेत म्हटले आहे.

# पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त

**नवी दिल्ली, द. ८ वृत्तसंस्था**

भारताने सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे. भारताने पाकिस्तानच्या हवाई संरक्षण यंत्रणेवर हल्ला करून ती यंत्रणा उद्ध्वस्त केली आहे. यासंदर्भातील माहिती भारताच्या संरक्षण मंत्रालयाने दिली आहे. भारताच्या हल्ल्यांमध्ये क्षेपणास्त्र लॉंचर्सचेही मोठे नुकसान झाले आहे. पाकिस्तानला चीनकडून HQ-9 हवाई संरक्षण प्रणाली मिळाली आहे.

पाकिस्तानी लोक चीनच्या HQ-9 ची तुलना भारताच्या S-400 हवाई संरक्षण प्रणालीशी करतात. पण आता भारताने HQ-9 तांत्रिकदृष्ट्या S-400 समोर कुठेही टिकत नाही हे दाखवून दिले आहे. HQ-9 ची रडार प्रणाली भारताच्या ब्राह्मोस सारख्या सुपरसॉनिक क्षेपणास्त्रांना रोखू शकेल अशी जवळजवळ कोणतीही शक्यता नाही. S-400 ची मारा क्षमता 400 किलोमीटर आहे आणि ती खूप कमी वेळात कार्यान्वित होऊ शकते.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर प्रत्युत्तरादाखल भारतानं सुरू केलेलं ऑपरेशन सिंदूर अजूनही चालू असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज सकाळी सर्वपक्षीय बैठकीत सांगितलं. त्याच्या काही तासांत संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनामध्ये भारतीय लष्करानं थेट पाकिस्तानच्या लाहोरजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त केल्याचं नमूद करण्यात

## भारतीय लष्कराचा आणखी एक 'धमाका'

आलं आहे. पाकिस्तानकडून होणाऱ्या कारवायांना जशास तसं उत्तर दिलं जाईल, असा स्पष्ट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

बुधवारी पहाटे केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये भारतानं पाकिस्तानातील दहशतवादी तळ लक्ष्य केले होते. गुरुवारी सकाळच्या कारवाईत पाकिस्तानात विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या एअर डिफेन्स रडार सिस्टीमला भारतीय हवाई दलानं लक्ष्य केल्याची माहिती या निवेदनात देण्यात आली आहे. "पाकिस्तान ज्या प्रकारे कारवाई करेल, त्याच पद्धतीने भारताकडून उत्तर दिलं जाईल. अशी खात्रीलायक माहिती समोर आली आहे की लाहोरजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त झाली आहे", असं संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. भारतीय लष्कराच्या या कारवाईमुळे पाकिस्तानच्या हवाई कारवाया मोठ्या प्रमाणावर थोपवून धरण्यास मदत होणार आहे.

दरम्यान, या निवेदनात भारताला ही कारवाई का करावी लागली, यासंदर्भात उल्लेख करण्यात आला आहे. "७ मे रोजी ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्यासाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत भारतानं हे स्पष्ट केलं होतं की आमची कारवाई ही पूर्णपणे दहशतवादी तळांवर केंद्रीत असून कोणत्याही लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्यात आलेला नाही. त्याचवेळी भारतीय लष्करानं स्पष्ट केलं होतं की भारतात लष्करी




ठिकाणांवर कोणत्याही प्रकारे हल्ला केल्यास त्याला जशास तसं उत्तर दिलं जाईल", अशा शब्दांत या निवेदनातून भूमिका मांडण्यात आली आहे.

"७ आणि ८ मे च्या मध्यरात्री पाकिस्तानकडून उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी ठिकाणांवर हल्ले करण्याचे प्रयत्न झाले. त्यात अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कापुरथला, जलंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नाल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज या १५ शहरांचा समावेश आहे. पाकिस्तानकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून हे हल्ले करण्यात आले. इंटीग्रेटेड काऊंटर यूएएस ग्रिड आणि एअर डिफेन्स सिस्टीमच्या मदतीने पाकिस्तानचे हे प्रयत्न हाणून पाडण्यात आले. हे पाकिस्तानचेच हल्ले असल्याचं या ड्रोन व क्षेपणास्त्रांच्या अवशेषांवरून स्पष्ट होत आहे", अशी माहिती या निवेदनात देण्यात आली आहे.

**पाकिस्तानला दिला इशारा**

दरम्यान, भारतीय संरक्षण मंत्रालयाने पाकिस्तानच्या या आगळिकीवर इशारा दिला आहे. "पाकिस्तानच्या या प्रयत्नात १६ निरपराध नागरिकांचा हकनाक बळी गेला आहे. त्यात तीन महिला व पाच लहान मुलांचा समावेश होता. पाकिस्तानकडून होणारा हा हल्ला रोखण्यासाठी भारताला प्रत्युत्तर देणं भाग पडलं. भारतीय लष्कर पुन्हा एकदा हे स्पष्ट करत आहे की आम्ही तणाव न वाढवण्यासाठी बांधील तेव्हाच आहोत, जेव्हा पाकिस्तानी लष्कराकडूनही या गोष्टीचं पालन केलं जाईल", अशा शब्दांत भारतीय लष्करानं पाकिस्तानला ठणकावलं आहे.

## "लाहोर सोडा", अमेरिकेच्या आपल्या नागरिकांना सूचना

जम्मू आणि काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारत सरकारने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध चांगलेच ताणले गेले आहेत. यादरम्यान संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनामध्ये भारतीय लष्कराने पाकिस्तानच्या लाहोरजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त केल्याची माहिती दिली आहे. याबरोबरच पाकिस्तानकडून होणाऱ्या कारवायांना जशास तसं उत्तर दिलं जाईल, असा स्पष्ट इशारा देखील या निवेदनात देण्यात आला आहे. यादरम्यान अमेरिकेने पाकिस्तानच्या लाहोरमध्ये असलेल्या त्यांच्या नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. ड्रोनचे स्फोट, ड्रोन पाडल्याचे तसेच लाहोरच्या जवळपासच्या हवाई हद्दीत घुसखोरी झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर अमेरिकेने पाकिस्तानच्या लाहोरमधील त्यांच्या वाणिज्य दूतावासातील सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचे निर्देश दिले आहेत,

### पाकिस्तानने रात्री केला हल्ल्याचा प्रयत्न

भारतीय लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, भारताच्या ऑपरेशन सिंदूर नंतर चवताळलेल्या पाकिस्तानने ७ आणि ८ मे २०२५ च्या रात्री अमृतसर, अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, जालंधर, भुज, आदमपूर, भटिंडा, लुधियाना भारतीय लष्कराच्या तळावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, भारतीय सैन्याने पाकिस्तानचा हा प्रयत्न हाणून पाडला. दरम्यान, HQ-9 ही चायना प्रेसिजन मशिनरी इम्पोर्ट-एक्सपोर्ट कॉर्पोरेशनने विकसित केलेली एक पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली आहे.

**'ऑपरेशन सिंदूर'मध्ये S-400 ची महत्वाची भूमिका**

'ऑपरेशन सिंदूर' मध्ये भारतीय हवाई दलाने पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्यासाठी हॅमर, स्कॅल्प आणि इतर अचूक शस्त्रांचा वापर केला. या ऑपरेशनमध्येही एस-४०० ने भारतीय हवाई क्षेत्राचे रक्षण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. शत्रूच्या कोणत्याही प्रतिहल्ल्याला हाणून पाडण्यासाठी ही प्रणाली सज्ज होती, यामुळे भारतीय लढाऊ विमानांना सुरक्षितपणे ऑपरेशन पूर्ण करता आले. पाकिस्तानचे अलिकडचे हल्ले हाणून पाडण्यात S-400 ने पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली. या प्रणालीने शत्रूचे ड्रोन आणि क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट केले, त्यामुळे भारतीय शहरांचे कोणतेही नुकसान झाले नाही.

## अग्राग्रलेख — खरीखरी

### पाकिस्तान नव्हे नर्कीस्तान

काल भारताने पाकिस्तानातील नऊ आतंकी अड्ड्यांवर हल्ला करून आतंक वाद्यांचे कंबरडे मोडण्याचा भीम पराक्रम केला. ते झाल्यावर पाकिस्तानकडून बदला घेण्याची भाषा करण्यात आली. त्याप्रमाणे आज अगदी पहाटे किंवा काल रात्री अगदी तारखेनुसार बोलायचे. तर सात आणि आठ मे च्या मध्यरात्रीत पाकिस्तानच्या आसिफ मुनीर याच्या नादान फौजेने बेभानपणा करून भारताच्या पंधरा शहरांजवळ असलेल्या सैन्याच्या तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये हल्ल्यापेक्षा कल्लाच जास्त होता. कारण पाकिस्तानने ड्रोन आणि मिसाईल द्वारे अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथाला, जालंदर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदिगड, नाल, फलोदी, उत्तरलाई आणि भूज या एकूण १५ शहरांवर केलेल्या हल्ल्याला भारताच्या एस- ४०० म्हणजेच सुदर्शन चक्राने पाकिस्तानच्या सर्व ड्रोनांना आणि मिसाइलांना हवेतच नष्ट करून टाकले. पाकिस्तान हा देश जन्मापासूनच खोटारडा आहे. आता इतके सगळे झाल्यावरही पाकड्यांचे खोट्या खोट्या पुड्या सोडणे सुरू होते. आपण भारताचे राफेल विमान पाडले असा दावा पाकडयांनी केला. भारताने आपले ऑपरेशन सिंदूर राबवताना जास्त सावधगिरीने तणाव वाढू नये. म्हणून पाकिस्तानची सैन्य स्थळे आणि सामान्य जनतेला कुठे क्षती पोहोचवली नव्हती. मात्र पाकिस्तानला विरत्वाचे स्फुरण चढल्यावर त्यांनी काल जो आततायीपणा केला. त्याला भारताने असे काही प्रत्युत्तर दिले की, आता संपूर्ण पाकिस्तानात हाहाकार माजलेला आहे. लोक सैरावैरा पळत आहेत. जनतेचे रक्षण करण्याची जबाबदारी पाकिस्तानच्या ज्या भुरट्या सेनेची आहे. ती सेना सध्या शेण खात फिरत आहे. खरे तर पाकिस्तान जवळ चीनने दिलेली हवाई संरक्षक प्रणाली होती. पण चीनचा माल कसा असतो. हे तुम्ही आम्हीच नाही, तर आता साऱ्या जगाने जाणलेले आहे. भारताजवळ रशियाचे एस-400 म्हणजे सुदर्शन चक्र होते. पण पाकिस्तानच्या राशीत सारेच ग्रह वक्र होते. त्या नंतर भारताने पाकिस्तानवर जे ड्रोन्स डागले. त्यात लाहोरच्या विमानतळाचे पार बारा वाजून गेलेले आहेत. पाकिस्तानच्या सेनेचे मुख्यालय रावळपिंडी येथे आहे. त्या रावळपिंडीतील क्रिकेटचे स्टेडियम भारताने पार उध्वस्त करून टाकलेले आहे. तिथेही विमानतळाची पार माती करून टाकलेली आहे. पाकडयांना आता पाकिस्तानातील जनताच वाकुल्या दाखवीत आहे. काही जन्मताच फेकूगिरी करण्यात पारंगत असतात. पाकिस्तान हे राष्ट्रही जन्मापासूनच या विषयात विशेष पारंगत आहे. पाठीवर व पोटावर कचाकचा लाथा खाऊन खाली पडल्यावर देखील, अभी मारा तो मारा, अब मार भला साले असे म्हणत एखादा दारुडा जसा हळूच पलायन करतो. अगदी तशीच पाकिस्तानी सेनेची अवस्था झालेली आहे. भारताने आता घोषितच करून टाकलेले आहे की, आता पाकिस्तानला क्षमा नाही. आमचे ऑपरेशन सिंदूर आता सुरूच राहणार आहे. पाकिस्तान काही दिवसांपूर्वी युद्धज्वरग्रस्त होता. आता पोटदुखीने त्रस्त आहे. पाकिस्तानचे राज्यकर्ते म्हणतात की पाकिस्तानात आतंकवादी नाहीत. मग आज मसूद अझरचा भाऊ रौफ अझर आणि इतर अनेक आतंकवाद्यांचा जनाजा ज्यावेळी निघाला. तेव्हा सर्व पाकिस्तानचे फौजी कसे काय हजर होते. भारताचे जाऊ द्या, चक्क अमेरिकेने ज्यांना आतंकवादी म्हणून घोषित केलेले आहे. अशा आतंकवाद्यांच्या जनाजाच्या मागे पाकिस्तानी सैन्य दलातील अनेक बडे बडे अधिकारी उभे होते. त्यातील एका लष्करी कमांडरचे नाव अब्दुल्ला रौफ होते. विशेष म्हणजे सर्वांनाच अमेरिकेने दहशतवादी म्हणून घोषित केलेले होते. शहाबाज शरीफ आपले भाऊ नवाज शरीफ यांच्याप्रमाणे विचार करणारे दिसत नाहीत. कारण त्याच्या उरावर अनेक आतंकवादी आणि पाकिस्तानच्या सेनेचा प्रमुख बसलेला आहे. त्याचे एकले नाही तर काय होईल, हे सांगता यायचे नाही. हे त्याला पक्के ठाऊक आहे. आता पाकिस्तानने काल रात्री आगळीक करून भारताला जी मोकळीक दिलेली आहे. त्याचा पूर्ण उपयोग करण्यासाठी भारत स्वतंत्र आहे. पाकिस्तानने काल तावातावात आपला पराक्रम दाखवण्याच्या प्रयत्न केला. तो त्यांचा बायलेपणा निघाला. आता मुनीर-शहाबाज किती दिवसात सत्ता सोडतात. हाच काय तो प्रश्न आहे. बाकी भारताने त्यांचे सर्व कपडे उतरवून टाकलेले आहेत. अशा या अवलक्षणी नंग्यांना आता जन्नत मुळीच मिळणार नाही. सध्या त्यांचे जहन्नूमची वाट पाहणे सुरू आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## भारत-पाकिस्तानचे एनएसए एकमेकांच्या संपर्कात

### तोडगा निघणार?

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**

एकीकडे भारताने पाकिस्तानातील दहशतवादाविरोधात लष्करी कारवाया सुरू केलेल्या असताना त्यांना राजनैतिक मार्गही खुले ठेवले आहेत. म्हणजेच, दोन्ही देशांमधील तणाव आणि संघर्ष कमी होण्याकरता भारताने पाकिस्तानबरोबर संपर्क ठेवला आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, पाकिस्तानचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार लेफ्टनंट जनरल असीम मलिक एकमेकांच्या संपर्कात असल्याचं वृत्त आहे. म्हणजेच, दोन्ही देशांदरम्यान तणाव असला तरीही देशातील संघर्ष कमी करण्याकरता राजनैतिक मार्ग खुले असल्याचंही वृत्त आहे. इस्लामाबादमधील भारतीय चार्ज डी अफेयर्स गीतिका श्रीवास्तव इस्लामाबादमधील प्रमुख संवादकांच्या संपर्कात आहेत.

**अमेरिकाही दोन्ही देशांच्या संपर्कात**

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारताने केलेल्या हल्ल्यांबद्दल निषेध करण्यासाठी पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने गीतिका श्रीवास्तव यांना बुधवारी समन्स बजावले होते. तर, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मार्को रुबियो यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याशी याविषयावर चर्चा केली. त्यामुळे हे दोन्ही देश एकमेकांच्या संपर्कात असल्याचं मार्को म्हणाले असल्याचंही सूत्रांचं म्हणणं आहे. परंतु, एका उच्चपदस्थ भारतीय अधिकाऱ्याने सांगितले की, "संपर्कात असणे म्हणजे चर्चेत असणे असे नाही."

## जलसंपदा विभागाची महामंडळे स्वायत्त होणार - विखे पाटील

**पुणे, दि. ८ प्रतिनिधी**

राज्यातील जलसंपदा विभागाची महामंडळे स्वायत्त करण्यात येणार आहेत. त्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी पुण्यातील सिंचन भवन येथे नियामक मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. या बैठकीला जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हणमंत गुणाले, मुख्य अभियंता (प्रकल्प) हणुमंत धुमाळ, यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

पत्रकारांशी संवाद साधताना विखे पाटील म्हणाले की, जलसंपदा विभागाची सध्या कार्यरत असलेली महामंडळे सद्यस्थितीत शासनावर अवलंबून आहेत. या महामंडळांचा विकास करण्यासाठी निधी अपुरा पडत आहे. त्यासाठी महामंडळे स्वायत्त केल्यास या महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या साधनांचा वापर करून निधी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. त्याचबरोबर महामंडळाच्या क्षेत्रात पर्यटन विकास वाढीवर भर देण्यात येऊन आणखी निधी कसा उभार करता येईला यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. फिशरी विकास करण्यासाठी कार्यपद्धतीचा वापर करण्यावर राहणार आहे.

## सर्वपक्षीय बैठकीत नेत्यांनी दिला 'एकजुटी' चा नारा

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**

पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निरपराध लोकांचा मृत्यू झाला होता. अनेक माताभगिनींचे कुंकू (सिंदूर) त्या दिवशी पुसले गेले. भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे अवघ्या पंचवीस मिनिटांत पाकिस्तानातील नऊ ठिकाणचे दहशतवादी तळ क्षेपणास्त्रांचा मारा करीत उद्ध्वस्त केले. यानंतर सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. काँग्रेससह अन्य पक्षांचे अनेक नेते या बैठकीला आवर्जून उपस्थित होते. सर्वपक्षीय नेत्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'बाबत सरकारची पाठराखण केली.



या सर्वपक्षीय बैठकीला काँग्रेसच्या वतीने मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उपस्थिती लावली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागच्या बैठकीला नव्हते आणि या बैठकीलाही नव्हते. संसदेपेक्षा आपण मोठे आहोत असे पंतप्रधानांना वाटत असेल. पण सध्याचा काळ टीका करण्याचा नाही. संकटकाळात आम्ही कुणावरही टीका करणार नाही. देशाच्या हितासाठी काही विषय गुप्त ठेवण्यात आले आहेत, असे आम्हाला बैठकीत सांगण्यात आले आहे. त्यानंतर आम्ही सगळ्यांनी सांगितले की, संकट काळात आम्ही सगळे तुमच्या सोबत आहोत. देशहितासाठी आम्ही तुमच्याबरोबर आहोत, असे मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटले आहे.

यानंतर राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, काँग्रेसने पूर्ण समर्थन दिले आहे. मल्लिकार्जून खरगे म्हणाले ते बरोबर आहे की, काही विषयांची चर्चा करायची नाही. आमचा पूर्ण पाठिंबा आहे. सर्वपक्षीय बैठकीत असलेल्या सगळ्याच पक्षांनी सरकारच्या पाकिस्तानविरोधी भूमिकेला पाठिंबा दिला आहे. या बैठकीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि किरण रिजेजू यांनी महत्त्वाची माहिती दिली.

दरम्यान, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थितांना सांगितले की, कुणाला ऑपरेशन सिंदूर बाबत माहिती किंवा इतर काही गोष्टी, मुद्दे विचारायचे असतील तर ते विचारा. ऑपरेशन सिंदूर हे अत्यंत संवेदनशील आहे. त्यामुळे सगळी माहिती आम्हाला देता येणार नाही. या बैठकीत मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, सुप्रिया सुळे, संजय राऊत यांच्यासह प्रमुख विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षांचे नेते उपस्थित होते.

## पाकिस्तान दहशतवादाचे केंद्र, भारताकडून पाकची पोलखोल

**नवी दिल्ली, द. ८ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत पाकिस्तानातील ९ दहशतवादी ठिकाणांवर हवाई हल्ले केले. या घटनेत जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबाचे सुमारे शंभर दहशतवादी ठार झाले. त्या हल्ल्यानंतर बिथरलेल्या पाकिस्तानने भारतातील १५ शहरांवर हल्ले केले, पण भारतीय सुरक्षा यंत्रणांनी हे हल्ले परतून लावली. या बाबत परराष्ट्र मंत्रालयाची पत्रकार परिषद झाली, यात परराष्ट्र सचिवांनी या कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली आणि पाकिस्तानची पोलखोलही केली.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, पाकिस्तान दहशतवादाचे केंद्र असतानाही त्याची जबाबदारी नाकारत आहे. जगातील अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचा हात आहे. दहशतवाद्यांच्या जनाज्यात पाकिस्तानी सैन्यातील अधिकारी आणि नेते मंडळी जातात. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आणि माजी परराष्ट्र मंत्र्यांनी पाकिस्तानचे दहशतवादासोबतचे संबंधही मान्य केले आहेत. पहलगाम हल्ल्याची निष्पक्ष चौकशी करण्याची पाकिस्तानची मागणी देखील दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. पठाणकोट आणि मुंबई हल्ल्यांबाबत भारताने सर्व पुरावे दिले पण पाकिस्तानने कोणतीही कारवाई केली नाही.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, सीमेपलीकडून आपल्याविरुद्ध बरीच चुकीची माहिती दिली जात आहे, वाढत्या तणावाबद्दल काही गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. पण पहिली गोष्ट म्हणजे पहलगाममधील हल्ला हा तणाव वाढण्याचे पहिले कारण आहे, भारतीय लष्कराने काल त्याला प्रत्युत्तर दिले आहे. ते म्हणाले की 'द रेझिस्टन्स फ्रंट' (टीआरएफ) गट हा लष्कर-ए-तैयबाचा एक सुप्रसिद्ध मोर्चा आहे. पहलगाम हल्ल्याची जबाबदारी घेणाऱ्या व्यक्तीबद्दलची सर्व माहिती आम्ही संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेला देत आहोत. टीआरएफबद्दल अपडेट्स सतत दिले जात आहेत. विक्रम मिस्री यांनी एक धक्कादायक खुलासा केला की जेव्हा यूएनएससीच्या निवेदनात टीआरएफचे नाव समाविष्ट करण्याची वेळ आली तेव्हा फक्त पाकिस्तानेच त्याला विरोध केला आणि ते नाव काढून टाकले. हे स्पष्ट संकेत आहे की पाकिस्तान अजूनही या दहशतवादी गटांना संरक्षण आणि पाठिंबा देत आहे.

## ऑपरेशन सिंदूर सुरुच! 100 दहशतवाद्यांचा खात्मा

**नवी दिल्ली , दि. ८ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मिरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यानी केलेल्या हल्ल्याचा सूड म्हणून केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. यात १०० दहशतवाद्यांचा खात्मा केल्याची माहिती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सर्वपक्षीय बैठकीत दिली. दरम्यान, या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी ऑपरेशन सिंदूर अद्याप सुरू आहे, असे स्पष्ट केले.

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी ठिकाणांवर केलेल्या कारवाईनंतर केंद्र सरकारने गुरुवारी सर्वपक्षीय बैठक बोलावून विविध राजकीय पक्षांना या कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली.

भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीर मधील नऊ दहशतवादी तळांवर अचूक हल्ले करून त्यांचा पूर्ण नायनाट केला, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सर्व पक्षांच्या प्रतिनिधींना बुधवारी सकाळी झालेल्या सैनिकी कारवाईची माहिती देण्यात आली. केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी नंतर पत्रकारांशी बोलताना याची माहिती दिली.

रिजिजू म्हणाले, "सर्व नेत्यांनी परिपक्वता दाखवत सरकारला पाठिंबा दिला आहे. सर्वपक्षीय बैठक ही एकजुटीचे प्रतिक ठरली. सर्व पक्षांनी ऑपरेशन सिंदूरसाठी भारतीय सशस्त्र दलांचे अभिनंदन केले आणि या कारवाईस पाठिंबा दिला." त्यांनी यावेळी हेही स्पष्ट केले की, ऑपरेशन अजूनही सुरू असल्याने तांत्रिक तपशील किंवा पुढील टप्प्यांची माहिती सध्या उघड केली



जाणार नाही. "हे सुरू असलेले ऑपरेशन असल्यामुळे, अधिकाऱ्यांना बैठकीस बोलावले गेले नाही," असेही रिजिजूंनी स्पष्ट केले.

**फेक न्यूजपासून सावध राहण्याचे आवाहन**

"देशात व देशाबाहेरून अनेक खोट्या बातम्या पसरवल्या जात आहेत. त्यामुळे सर्व पक्षांनी आणि नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा," असे आवाहन रिजिजूंनी केले.

खासदार असदुद्दीन ओवैसी यांनीही बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले, "सरकारकडे पाकिस्तानला सामोरे जाण्याची आणि काश्मिरी जनतेला जवळ घेण्याची सुवर्णसंधी आहे." त्यांनी पुढे सुचवले की, "पुंछ हल्ल्यात ज्यांनी आपले प्राण गमावले त्यांना 'दहशतवाद पीडित' म्हणून घोषित केले जावे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी घर व आर्थिक मदत द्यावी." "या कारवाईत भावलपूर आणि मुरिदके हे दोन प्रमुख दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले, हे महत्त्वाचे यश आहे," असेही ओवैसी यांनी नमूद केले. काही आंतरराष्ट्रीय माध्यमांनी बठिंडामध्ये राफेल कोसळल्याचा दावा केला असून, भारतीय हवाई दलाने या अफवांचे त्वरित खंडन करावे, असेही ते म्हणाले.

## बेस्ट बसच्या दरात दुप्पट वाढ

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

मुंबईकरांसाठी मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे. मुंबईकरांचा बस प्रवास आता महाग होणार आहे. बेस्ट बसच्या प्रवासभाड्यामध्ये दुप्पट वाढ करण्यात आली आहे. ही भाडेवाढ आज पासून ( ९ मे ) पासून लागू करण्यात येणार आहे. दरम्यान या भाडेवाढीचा फटका सर्वसामान्य मुंबईकरांना बसणार आहे.

विद्यमान भाडेसारणीमध्ये ५, १०, १५, व २० कि.मी. अंतरावर भाडेटप्पा देण्यात आले होते. तथापी प्रस्तावित भाडेतक्त्यामध्ये५, १०, १५, २०, २५,३०, ३५, ४०, ४५ व ५० कि.मी. व त्यानंतर प्रत्येक ५ कि.मी. अंतरावर भाडेटप्पा देण्यात आलेले आहेत.

**विना वातानुकूलित बससेवा :** ५ कि.मी. अंतरापर्यतचे किमान प्रवासभाडे ५ रुपयावरुन १० रुपये करण्यात आले आहे.

**वातानुकूलित बससेवा :** ५ कि.मी. अंतरापर्यंतचे किमान प्रवासभाडे ६ रुपयावरुन १२ रुपये करण्यात आले आहे.

**सवलतीचे प्रवास भाडे :** विद्यमान प्रवासभाड्यात १२ वर्षे वयापर्यतच्या मुलांना सवलतीच्या प्रवासभाड्याची तरतूद उपलब्ध नाही. परंतू, नवीन सुसूत्रीकरणादरम्यान ५ ते १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना प्रवासभाड्यात सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.



**दैनंदिन / मासिक बसपास :** या दैनंदिन / मासिक बसपासच्या सहाय्याने प्रवासी मुंबई शहर, उपनगरे तसेच बेस्ट उपक्रमाचे बसप्रवर्तन कार्यरत असलेल्या संपूर्ण प्रवर्तन क्षेत्रामध्ये अमर्याद प्रवास करु शकतील. दैनंदिन बसपासचे शुल्क रु.६०/- वरून रु.७५/- करण्यात आलेले आहे. व मासिक शुल्क रु.९००/- वरुन रु.१८००/- करण्यात आलेले आहे.

**शालेय विद्यार्थ्यांकरीता बसपास :** उपक्रमाच्या बससेवांवर खासगी शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, विद्यापीठ यामधून शिक्षण घेणाऱ्या वयोमर्यादा 26 वर्षाखालील विद्यार्थ्यांना विद्यमान सवलतीच्या दरात बसपास उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या बसपासच्या मुल्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**महापालिका शाळेतील गणवेषधारक विद्यार्थी:** महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना उपक्रमाच्या बसगाड्यांमधून मोफत प्रवासाची सुविधा विद्यमान पध्दतीने CHALO स्मार्टकार्डच्या सहाय्याने देण्यात येणार आहे.

**ठराविक अंतराचे बसपास :** प्रवासी त्यांनी निश्चित केलेल्या अंतरादरम्यान ठराविक बसफेऱ्यांसाठी साप्ताहिक आणि मासिक पासचा वापर करुन प्रवास करू शकतात.

बेस्टच्या आर्थिक डबघाईवर तोडगा काढण्यासाठी ही भाडेवाढ करण्यात आली असल्याची माहिती आहे. त्यामुळे अगोदरच वाढत्या महागाईने वैतागलेल्या मुंबईकरांच्या खिशावर आणखी भार पडणार आहे. अनेक सामान्य नागरिक रिक्षा, टॅक्सी अशा खासगी वाहनांएवजी माफक दरात वाहतूक सेवा पुरवणाऱ्या बेस्ट बसला पसंती देतात. मुंबई आणि उपनगरातील अनेक भागांमध्ये बेस्ट बसला शेअर टॅक्सी आणि शेअर ऑटो रिक्षाचा पर्याय आहे. मात्र, शेअर रिक्षा आणि टॅक्सीचे भाडेही मुंबईतील अनेक गरीब वर्गाला परवडत नाही. त्यामुळे हे लोक तासनतास बसच्या रांगेत उभे राहून प्रवास करतात. मात्र, आता बेस्ट बसच्या तिकीटाच्या दरात दुप्पटीने वाढ झाल्याने सर्वसामान्य वर्गाला मोठा फटका बसणार आहे.

## कंधार प्लेन हायजॅकचा मास्टरमाइंड रौफ असगर ठार

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतानेपाकिस्तानवर केलेल्या ऑपरेशन सिंदूर हल्ल्यात कुख्यात दहशतवादी रौफ असगरचा खात्मा झाल्याची माहिती पुढे आली आहे. ६ मे रोजी रात्री भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरातील ९ दहशतवादी ठिकाणांना टार्गेट करत मिसाईल हल्ला केला. या हल्ल्यात १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. त्यात मसूद अजहरच्या कुटुंबातील १० जणांना यमसदनी धाडले. आता रौफ असगरही हल्ल्यात ठार झाल्याची बातमी आहे.

रौफ असगर हा IC-814 प्लेन हायजॅक जे कंधार प्लेन हायजॅक नावाने ओळखले जाते, या घटनेचा मास्टरमाईंड होता. २४ डिसेंबर १९९९ साली इंडियन एअरलाईन्सची फ्लाईट काठमांडूहून दिल्लीला येत होती. मात्र ५ दहशतवाद्यांनी या विमानाचं अपहरण केले. त्यात १७६ प्रवाशांसह १५ केबिन क्रू सदस्य होते. भारतीय इतिहासात ही सर्वात मोठी आणि भयानक घटना होती. अपहरणकर्त्या दहशतवाद्यांनी हे विमान अमृतसर, लाहोर, दुबई आणि शेवटी अफगाणिस्तानातील कंधार येथे गेले. त्याठिकाणी तालिबानीचं शासन होते.

काठमांडूच्या त्रिभुवन विमानतळावरून या विमानाने उड्डाण घेतले. त्यानंतर भारतीय हवाई हद्दीत प्रवेश करताच दहशतवाद्यांनी बंदुकीच्या धाकावर पायलटला सांगून हे विमान काबुलला नेले. लाहोरमध्ये पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी या विमानाला लँडिंगची



परवानगी देत तिथे इंधन भरले. त्यानंतर विमान दुबईला पोहचले. तिथे विमानातील २७ प्रवाशांचे मृतदेह उतरवले. २५ डिसेंबरला विमान कंधारला पोहचले. तिथे तालिबानच्या मध्यस्थीने हायजॅकर्सने त्यांच्या मागण्या ठेवल्या. ज्यात ३६ दहशतवाद्यांची सुटका, २०० मिलियन डॉलरचा समावेश होता. दीर्घ काळ चर्चेनंतर भारताने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी ३ दहशतवादी सोडण्याचा निर्णय घेतला. त्यात मसूद अजहरचा जो जैश-ए-मोहम्मदचा प्रमुख आहे, त्याच्यासोबत उमर सईद शेख, मुश्ताक अहमद जरगर याचा समावेश होता.

अब्दुल रौफ असगर हा १९९९ च्या कंधार प्लेन हायजॅकचा मास्टरमाईंड होता. मौलाना मसूद अजहरचा तो छोटा भाऊ होता. रौफने भावाला जेलमधून सोडण्यासाठी उल मुजाहिद्दीन आणि आयएसआयची मदत घेतली. भारताविरोधातील अनेक दहशतवादी कारवायात रौफचा हात होता. जैश ए मोहम्मदच्या दहशतवादी कटात त्याचा सहभाग असायचा. तो भारतातील मॉस्ट वॉन्टेड दहशतवादी होता. ज्याला ऑपरेशन सिंदूरमधून भारतीय सैन्याने ठार केले आहे.

## काहीही होऊ शकते, गृह विभागाकडून गाइडलाइन्स जारी

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**

भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे. पाकिस्तानने ऑपरेशन सिंदूरनंतर भारताच्या 15 शहरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण भारताने पाकिस्तानता हल्ला हाणून पाडला. यानंतर भारताने पाकिस्तानच्या 12 शहरांमध्ये 50 ड्रोन हल्ले केल्याची माहिती आहे. या घडामोडींनंतर आता केंद्र सरकार आणि राजस्थान सरकार देखील सतर्क झालं आहे. राजस्थान सरकारच्या गृह विभागाने एक सूचना जारी केली आहे. यात राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाकिस्तानी हल्ल्याला तोंड देण्यासाठी सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत काय तयारी करायची, याबाबत गाईडलाईन्स जारी करण्यात आले आहेत.

गृह विभागाने जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना आपत्ती व्यवस्थापनाची यंत्रणा तयार ठेवण्यास सांगितले आहे. गृह विभागाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, शत्रू देशाने हल्ला केल्यास रुग्णालयांमध्ये जीवनावश्यक औषधे उपलब्ध ठेवावे असे सांगण्यात आले आहे. तसेच, रक्तपेढ्यांमध्ये सर्व रक्तगटाचे रक्त पुरेसे असावे, असं सांगण्यात आलं आहे. तसेच रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची उपस्थिती राहायला हवी. तात्पुरती निवारा केंद्रे म्हणून निवडलेल्या इमारतींमध्ये जनरेटरची व्यवस्था करावी, असे गृह मंत्रालयाने आदेशात म्हटलं आहे. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सोशल मीडियावर लक्ष ठेवण्यास सांगण्यात आलं आहे. देशाविरोधात भडकाऊ पोस्ट टाकणाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे राज्यातील वातावरण बिघडणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यांमध्ये पुरेसा अन्नसाठा ठेवावा. लोकांनी अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सामाजिक कार्यातून स्व. जनार्दन भगतसाहेबांचे निरंतर स्मरण

## भगतसाहेबांमुळे समाजकार्याला महत्व - लोकनेते रामशेठ ठाकूर

पनवेल: राजकारणापेक्षा समाजकारण महत्वाचे असते आणि हि समाजहिताची शिकवण स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी दिली, त्यामुळेच समाजकार्याला महत्व मिळाले, असे प्रतिपादन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी (दि. ०७ मे ) उलवा नोड येथे केले.

कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७ व्या पुण्यतिथी निमित्ताने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था आणि व्यक्तींचा गुणगौरव तसेच पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५" पारितोषिक वितरण समारंभ उलवे नोड मधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे समारंभपूर्वक व मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी समारंभ अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन करताना बोलत होते. स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी अहोरात्र आपला देह



'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या तत्त्वाच्या पूर्ततेसाठी कारणी लावला. तळागाळातल्या लोकांबदल त्यांना विशेष प्रेम होते. दारिद्रय व भूक यांच्याबद्दल अगदी मनापासून तळमळ होती. तळागाळातील समाजाचा उद्धार फक्त शिक्षणामूळेच होऊ शकते हे त्यांनी जाणले होते. आपली दूरदृष्टी, अविश्रांत श्रम, चिकाटी, धडाडी त्याचबरोबर व्यापक समाजहिताची तळमळ ही उदात्त भावना स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या अंतःकरणात कायम होती. जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवत फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी विभागातील भांडणतंटे दूर करण्याच्या दृष्टिकोनातून देवदूताची भूमिका सुद्धा पार पाडत समाजाला न्याय दिला.भगतसाहेबांनी कुटुंबाला नाही पण समाजाच्या हितासाठी आपले आयुष्य खर्च केले. त्यांच्या मुशीतून राजकीय, सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते घडविले. त्याचबरोबर बेळगाव सीमा प्रश्नावर त्यांनी एक वर्ष कारावास सोसला आहे. भगतसाहेबांचे कार्य अफाट राहिले आहे, त्यामुळे त्यांचा त्याग आणि त्यांची स्मृती कायम स्मरणात रहावे, यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भगतसाहेबांची जयंती आणि पुण्यतिथी सामाजिक उपक्रमात साजरी केली जाते. त्या अनुषंगाने यंदाही पुण्यतिथीचा कार्यक्रम समाजोपयोगी उपक्रमाने पार पडला. यावेळी ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५" मधील विजेत्या ग्रामपंचायतींचा तसेच गुणिजनांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच यावेळी 'देवकी मीडिया' प्रस्तुत व 'कलारंजना मुंबई' निर्मित, उदय साटम संकल्पित आणि दिग्दर्शित "मराठी पाऊल पडते पुढे" हा १०१ कलावंताचा संच असलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा ४६०० वा प्रयोग सादर झाला. या समारंभाचे प्रास्ताविक जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केले. त्यांनी भगतसाहेबांच्या कार्याला व आठवणींना उजाळा दिला.

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे झालेल्या या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेश बालदी, भगतसाहेबांच्या कन्या व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, दिबासाहेबांचे सुपुत्र अतुल पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,,.

# गौळवाडी येथे राधाकृष्ण पालखी सोहळ्याचे आयोजन.

तळाः तळा तालुक्यातील मौजे गौळवाडी येथे शनिवार दि.१० मे रोजी राधाकृष्ण पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गौळवाडी ग्रामस्थाचे यंदाचे २५ वे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने शुक्रवार व शनिवार असे दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यामध्ये शुक्रवार दि.९ मे रोजी सकाळी १० वा.मुलांचे खेळाचे कार्यक्रम,दुपारी २ वा. महिलांसाठी संगीत खुर्ची कार्यक्रम,सायंकाळी ४ वा. हळदीकुंकू,५ वा. सभासदांचा सत्कार समारंभ,७ वा. नृत्य आणि वक्तृत्व स्पर्धा,रात्री ९.३० महाप्रसाद तर शनिवार दि.१० मे रोजी पहाटे ३ वा. गणेश पूजा व होमहवन,६ वा. महाआरती,७ वा. पालखी मिरवणूक,दुपारी ३.३०



वा. श्री सत्यनारायणाची महापूजा,सायंकाळी ७ वा. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार,रात्री ८ वा. महाप्रसाद,१० वा. भजन अशाप्रकारे कार्यक्रम पार पडणार असून भाविकांनी उपस्थित राहून तीर्थ प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री राधाकृष्ण युवक मंडळ, गौळवाडी ग्रामस्थ व श्री समर्थ महिला बचत गट यांच्याकडून करण्यात आले आहे.

# रोह्यात अवकाळी सततच्या पावसामुळे नागरिक हैराण

रोहाः रोहा तालुक्यात धाटाव , धामणसई , विरजोळी , चणेरा , सुतारवाडी , कोलाड , भातसई , मेंढा , वाली या भागात गेल्या तिन दिवसापासून अवकाळी पाऊस पडत आहे . त्यामुळे तालुक्यातील नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली असून बदलता हवामानामुळे आरोग्यावर परिणाम होतो की काय अशी शंका देखील नागरिकांच्या मनात येऊ लागली आहे . सध्या आंब्याचा उत्पादन मोठ्या प्रमाणावर आले होते परंतु



आंब्याच्या ऐन सीझनमध्ये अवकाळी पावसामुळे बागायतदाराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे . परिणामी व्यापारी वर्ग व वीट भट्टी मालक सुद्धा देखील चांगलेच भयभीत झालेला दिसत आहे .

दरम्यान गेल्या तिन दिवसापासून अवकाळी पाऊस दाखल झाल्यामुळे शेतकरी आणि व्यावसायिकांची धांदल उडाली असून शेतकऱ्याचे आंबा बागायती, जाभूळ, मिरची सह अन्य विविध पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. तर वीटभट्टी चालकांना देखील अवकाळीचा मोठा फटाका बसला असून उत्पादित विटा पाण्यामध्ये विरघळून खराब झाल्या आहेत. हजारो रुपये गुंतवून तयार केलेल्या विटाचे नुकसान झाल्यामुळे व्यावसायिक हवालदिल झाले आहेत. त्याच प्रमाणे उघड्यावर दुकाने लावून व्यवसाय करणाऱ्या नागरिकांच्या विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या साहित्याचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून त्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

# बाळगंगा धरण प्रकरण; संकलन अंतीम यादीत अफरातफर झाला असल्याचा प्रकल्पग्रस्तांचा आरोप

## पंचायत समिती कडून अहवाल मागवून चौकशी करणार - प्रांताधिकारी प्रवीण पवार

पेण: मागील अनेक वर्षांपासून भ्रष्टाचाराच्या आरोपांनी राज्यभर गाजणाऱ्या बाळगंगा धरण प्रकल्पातील आता आणखी एक प्रकार समोर येत असून बाळगंगा धरण प्रकल्पांतर्गत संकलन रजिस्टर नुसार जी अंतिम यादी तयार करण्यात येत आहे त्यामध्ये



अफरातफर झाल्याचा आरोप येथील प्रकल्पग्रस्त अनुप गायकवाड यांनी करत त्यांनी त्याप्रकारे प्रांताधिकारी कार्यालय आणि पेण पंचायत समिती कार्यालयाकडे तक्रार अर्ज देखील दाखल केला आहे. याबाबत प्रांताधिकारी प्रवीण पवार यांनी सदर प्रकरणाचा अहवाल पंचायत समिती कडून मागवून घेऊन त्याची चौकशी केली जाईल असे सांगण्यात आले आहे. बाळगंगा धरण नदी प्रकल्प अंतर्गत भूखंड वाटपाबाबत संयुक्त मोजणी सन 2019 चे संकलन रजिस्टर नुसार जी अंतिम यादी तयार करण्यात आली आहे त्यामध्ये येथील प्रकल्पग्रस्त संघटनेचे सचिव चंद्रकांत होजगे यांनी नियमात बसत नसलेल्या व्यक्तींना या यादीमध्ये बसवून शासनाची फसवणूक केली असल्याचा आरोप निवेदनाद्वारे केला आहे. सदर यादीतील संकलन अनुक्रमांक 257 असुन घर क्रमांक 107/अ आहे. त्यामध्ये एकूण बाधित मूळ कुटुंब संख्या 5 आहे आणि 18 वर्षांवरील संख्या 5 अशी आहे. तसेच घर क्रमांक 107/अ हे चंद्रकांत होजगे यांच्या नावावर आहे. मुलीचे कुटुंब घर क्रमांक 107/ब हे वेगळे असून सुद्धा 107/अ मध्ये कुटुंब संख्येत तिचे नाव नमूद केले आहे. तर 8/अ च्या उताऱ्यावर आणि संकलनामध्ये सुशिल शिंदे, केतन भोईर, भारती भोईर, मंगल शिंदे ही नावे नसताना सुद्धा अंतिम यादीमध्ये भूखंडाच्या लाभापोटी ग्राम पंचायत अधिकारी व ग्राम पंचायत कर्मचारी यांच्याशी संगनमत करून ग्राम पंचायत सदस्या ज्योत्स्ना होजगे आणि माजी सरपंच तथा बाळगंगा धरण संघर्ष समितीचे सचिव चुकीची नावे समाविष्ट केला असल्याचे आरोप अनुप गायकवाड यांनी करून त्यांनी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

> तक्रारदाराने केलेला अर्ज हाताळला आहे.त्याबाबत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवक यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल आल्यानंतर पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
> प्रवीण पवार, प्रांताधिकारी - पेण

बाळगंगा धरण प्रकल्पामध्ये सुरुवातीपासूनच फार मोठा भ्रष्टाचार झालेला आहे आणि आजपर्यंत ही भ्रष्टाचाराची कीड अशीच लागून आहे. विशेष म्हणजे हा प्रकल्पा आल्यानंतर त्याचा पुरेपूर लाभ योग्य लाभार्थ्यांना व्हावा यासाठी आम्ही ग्रामस्थांनी सर्वानुमते एक संघर्ष समिती नेमली आणि त्याच संघर्ष समितीच्या सचिवांनी संकलन यादीमध्ये अफरातफर करून काही नावे वाढविली आहेत, त्याबाबत आम्ही पुरावे सादर केले आहेत, त्याची शहानिशा करून आम्हा प्रकल्पग्रस्तांना योग्य न्याय मिळावा आणि संबंधितांवर कारवाई व्हावी.
- अनुप गायकवाड, प्रकल्पग्रस्त ग्रामस्थ

> सदर संकलन यादी अद्यापपर्यंत फायनल झालेली नाही. मुळात सुशिल शिंदे, केतन भोईर, भारती भोईर, मंगल शिंदे हे प्रकल्पग्रस्त भूखंडाच्या लाभापासून वंचित राहिले होते. त्यांना आम्ही योग्य ते पुरावे देऊन संकलन यादीमध्ये समाविष्ट करून घेऊन त्यांना न्याय मिळवून दिले आहे. सदर प्रकरणाची कागदपत्रे हाताळून प्रशासन योग्य तो निर्णय देईल आणि प्रशासन जो निर्णय देईल तो मला मान्य असेल.
> चंद्रकांत होजगे, सचिव बाळगंगा धरण संघर्ष समिती

# पनवेल महानगरपालिकेत मॉकड्रिल यशस्वी

## अग्निशमन विभागाने दिल्या बचावाच्या सूचना

पनवेलः आपत्ती काळात नागरिकांना योग्य त्या सूचना मिळाव्यात आणि ते सुरक्षित रहावेत याकरिता मॉकड्रिल चे आयोजन करण्यात येते. मॉकड्रिल संदर्भातील सूचनेनुसार आज पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात अग्निशमन विभागामार्फत मॉकड्रिल चे आयोजन करण्यात आले.

चार वाजता सायरन वाजवत अग्निशमन दलाची गाडी महापालिकेच्या प्रवेश दाराजवळ उभी राहिली आणि बिल्डिंगला आग लागली आहे तातडीने बिल्डिंग करावे अशा सूचना देत संपूर्ण इमारत रिकामी केली.



इमारतीच्या बाहेर सर्वजण जमा झाल्यानंतर अग्निशमन विभागाच्या वतीने उपस्थितांना आपत्ती काळात काय करावे?काय कुठे? याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. छोटे अग्निशमन यंत्र ज्याला बाटला असे म्हणतात. त्याचा वापर कसा करावा याचेही प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे,परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, स्वरूप खारगे, मुख्या लेखा वित्त अधिकारी मंगेश गावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, शहर अभियंता संजय कटेकर, डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड , तसेच महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# वनविभाग व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी रमेश रावजी जाधव यांची निवड

पाली: गुप ग्रामपंचायत महागाव अंतर्गत विविध व्यवस्थापन कमिटी नेमल्या जातात. यामध्ये महागाव ग्रामपंचायतच्या भोवताली



वनविभाग मोठ्या प्रमाणात असल्याकारणाने वनव्यवस्थापन कमिटी महत्त्वाची समजली जाते. या अनुषंगाने दि.६ रोजी झालेल्या ग्रामसभेमध्ये गुप ग्रामपंचायत मध्ये वन विभाग मार्फत संयुक्त वन व्यवस्थापन समिती नव्याने गठित करण्यात आली . यामध्ये रमेश रावजी जाधव यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

तर किसन अशा गावारने यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. रामि शंकर भला ,तृप्ती शशिकांत शिर्के , लीना वैभव पवार, महेंद्र धानिवले, गंगू भीम पवार ,पांडुरंग सदाशिव कांबळे, सदाशिव पवार, कैलास लोलगे, राजेश भगत ,शांताराम घाटवळ , परशुराम निरगुडे, हिरामण माडे यांची सदस्य पदी निवड करण्यात आली. तर वन विभागाचे अधिकारी पाटील यांची सचिव पदी निवड करण्यात आली. ही निवड सर्वानुमते करण्यात आली . महागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच दीपिका विजय सुतार उप.सरपंच महेंद्र धानिवले व ग्रामपंचायत अधिकारी नितीन भोसले यांच्या नेतृत्वात ही बैठक संपन्न झाली. सदर निवडीबाबत रमेश जाधव यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# घंटागाडीची दुचाकीला धडक

## एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी

पनवेल: पालिकेच्या घंटागाडीने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील एका तरुणाचा मृत्यू तर दुसरा तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना तळोजा एमआयडीसीमध्ये घडली. तळोजा पोलिसांनी घंटागाडी चालकाविरोधात गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले आहे. अपघातातील मृत तरुणाचे नाव अभिजित भोपी (२१) असे असून जखमी तरुणाचे नाव आदेश पाटील (१९) असे आहे. अभिजित आणि आदेश दोघेही तळोजा येथील नितळस गावात राहण्यास आहेत. आदेशच्या मोठ्या भावाचे लग्न असल्याने तो त्याचा मित्र अभिजित याच्यासोबत दुचाकी घेऊन खरेदीसाठी घोटगाव येथे गेला होता. दरम्यान, ते घोटगाव येथून तळोजा एमआयडीसीतील राम के कंपनीकडे जाणाऱ्या मार्गावरील चौकात आले असता पालिकेच्या घंटागाडीने त्यांना धडक दिली. त्यामुळे अभिजित व आदेश हे दोघेही गंभीर जखमी झाल्याने त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान अभिजितचा मृत्यू झाला.

# सार्थक देशमुखचे बारावीत घवघवीत यश

## बारावी सायन्स मध्ये तालुक्यात प्रथम

पाली, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीचा निकाल दि.५ रोजी जाहीर झाला. दुपारी एक वाजता विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने निकाल पाहिला. सुधागड तालुक्यातील ग.बा. वडेर हायस्कूलमध्ये शिकणारा सार्थक संजय देशमुख याने बारावी सायन्स या वर्गामध्ये सुधागड तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.

सार्थक देशमुख वाघोशी येथील राहणारा आहे. सार्थक चे वडील हे शाळेतील विद्यार्थी वाहण्याचे काम करतात. विद्यार्थ्यांना ने-आण करण्याचे काम करीत असल्याने त्यांना शिक्षणाचं महत्त्व माहीत आहे, त्यामुळे वडिलांनी सार्थक ला कोणत्याही शैक्षणिक बाबी कमी पडू दिल्या नाहीत. सार्थक ने देखील याचे गांभिर्य लक्षात घेत अभ्यासात अधिक मेहनत घेत जिद्द व चिकटीच्या जोरावर वडिलांच्या मेहनतीची पराकाष्ठा केली.

सार्थकने इयत्ता बारावी मध्ये संपूर्ण तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून त्याच्या वडिलांचे, गावाचे व शाळेचे नाव उज्वल केले. त्याच्या या घवघवीत यशाचे कौतुक होत असून सर्व स्तरावरून सार्थकचे अभिनंदन होत असून शुभेच्छा देण्यात येत आहेत.



# तळा तालुक्यात भीषण अपघात

तळा: तालुक्यातील तळा नगरपंचायत हद्दीतील तारणे येथील एका धोकादायक वळणावर भीषण अपघात झाला आहे. रहाटाड येथून तळा येथे येणारी एसटी बस आणि आगरदंडा दिशेने जाणाऱ्या डंपरमध्ये समोरासमोर जोरदार धडक



झाली. या अपघातात तृप्ती विजय खुटीकर,लक्ष्मण ढेबे,अनन्या रुपेश गवाणे,विठ्ठल कजबजे या चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून, मृतांमध्ये एका सात वर्षांच्या बालिकेचाही समावेश आहे.या अपघातात जवळपास वीस ते पंचवीस प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने तळा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.प्रथमदर्शनी पाहता, अपघातास डंपर चालकाचा हलगर्जीपणा कारणीभूत ठरत असून, तो चालवत असलेला डंपर देखील निकृष्ट स्थितीत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. विशेष म्हणजे, डंपर चालवणारा चालक वीस वर्षांखालचा असल्याचेही काही नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. एसटी चालकाने प्रसंगावधान राखल्यामुळे अपघाताची तीव्रता काही प्रमाणात कमी झाली, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मात्र, तारणे येथील या वळणावर यापूर्वीही अनेक अपघात झाले असून, प्रशासनाने या ठिकाणी तातडीने सुरक्षेच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# बनावट पावती पुस्तकाच्या आधारे शासनाची लाखोंची रॉयल्टी बुडवली

पनवेल: पनवेल व उरण भागातून गौण खनिज वाहून नेणाऱ्या पियुष एंटरप्रायजेस या कंपन्यांच्या मालकाने बनावट गौण खनिज वाहतुक पावती पुस्तक बनवुन त्यावर रायगडच्या जिल्हा खनिजकर्म अधिकाऱ्यांचा बनावट शिक्का मारुन त्या पावत्यांच्या आधारे दगडखाणीची बेकायदेशीरपणे वाहतुक करुन शासनाची लाखो रुपयांची रॉयल्टी बुडविल्याचे उघडकीस आले आहे.

पनवेल शहर पोलिसांनी बनावट गौण खनिज वाहतुक पावती पुस्तक बनविणाऱ्या पियुष एंटरप्रायजेस या कंपनीच्या मालकाविरोधात बोगस कागदपत्र बनविणे व त्या आधारे शासकीय महसुल बुडविणे आदी कलमान्वये गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे. जवाहरलाल नेहरु पोर्ट ऍथोरिटीने डिसेंबर 2024 मध्ये रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात गौणखनिजाची वाहतूक झालेल्या बनावट पावत्या जमा करुन त्याबाबत माहिती दिली होती. रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने मंडळ अधिकारी मिनाक्षी गोंधळी यांनी दोन्ही पावती पुस्तकांची तपासणी केली असता, त्या पुस्तकावर जिल्हा खनिजकर्म अधिकारी रायगड यांचा बनावट शिक्का असल्याचे आढळुन आले. सदरचे पावती पुस्तक हे पियुष एंटरप्रायजेस या कंपनीने तयार केल्याचे निदर्शनास आले. यावरुन सदर बनावट गौण खनिज पावत्यांच्या आधारे दगडखाणाची बेकायदेशीरपणे वाहतुक करुन शासनाची लाखो रुपयांची रॉयल्टी बुडविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर मंडळ अधिकारी गोंधळी यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी पियुष एंटरप्रायजेस या कंपनीविरोधात फसवणूकीसह बनावटगीरी करणे, तसेच महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदरच्या बनावट गौण खनिज वाहतुकीच्या पावत्या कुठे छापण्यात आल्या, तसेच त्यावर मारण्यात आलेले जिल्हाधिकारी कार्यालयाचे शासकीय शिक्के कुठे तयार केले? याबाबत पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

# पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन अंतर्गत मोठी कारवाई

## उलवे पोलीसांच सर्वत्र होत आहे कौतुक

पनवेल: शहरातील वाढत्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्याबरोबरच बेकायदेशीर कृत्य आणि अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी विविध भागात कोंबिंग ऑपरेशन राबविण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर उलवे पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग ऑपरेशन राबवून बेकायदेशीर कृत्य करणारे, अवैध धंदे करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारांचे तसेच अंमली पदार्थ आणि मठाचे सेवन, विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील वाढत्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्याबरोबरच शहरातील कायदा-सुव्यवस्था अबाधित रहावी, यासाठी नवी मुंबई पोलिसांनी रेकॉर्डवरील आरोपी, पाहिजे आरोपी, गुंड, हिस्त्रीशीटर तसेच अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांची झाडाझडती सुरु केली आहे. याच पार्श्वभूमीवर उलवे पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग अपिशन राबविण्यात आले. या कोंबिंग ऑपरेशन दरम्यान ७ हिस्त्रीशिटरच्या तपासणीत दोघे मिळून आले, २ जेलमध्ये असल्याचे आढळून आले. मात्र, तिघेजण मिळून आले नाहीत. तसेच १ पाहिजे असलेला आरोपी मिळून आला नाही. या कोंबिंग ऑपरेशन दरम्यान परराज्यातील १३२ मजुरांची आणि त्यांच्या आधारकार्डची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मजूर बांग्लादेशी नागरिक असल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे दारुबंदी कायद्यान्वये दाखल २ गुन्हे दाखल करण्यात आले. महाराष्ट्र पोलीस कायद्याप्रमाणे ४ कारवाया करण्यात आल्या. १२ आफ्रिकन नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्याचप्रमाणे २ लॉज आणि ३ परदेशी नागरिक गेस्ट हाऊसची तपासणी करण्यात आली. नाकाबंदी कारवाईत ४४ चारचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली, त्यातील ८ वाहनांवर कारवाई करण्यात आली. तसेच ३३ दुचाकींची तपासणी करून त्यातील ६ वर कारवाई करण्यात आली. यादरम्यान सेक्टर-१९, १९ ए परिसरात प्रभावीपणे पायी गस्त करण्यात आली. पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या कोंबिंग ऑपरेशनमध्ये स्वतः वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने यांच्यासह ७अधिकारी आणि २९ अंमलदार सहभागी झाले होते.

# पुण्यतिथीनिमित्त भगतसाहेबांना अभिवादन

पनवेल: थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज (दि. ०७) स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, शकुंतला रामशेठ ठाकूर, काँग्रेसचे रायगड तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, संजय भगत, प्रकाश भगत, पांडुशेठ घरत, वसंतशेठ पाटील, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच



जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठनेते वाय. टी. देशमुख, अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिकांनी भगतसाहेंबाच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करत त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन केले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, हरेश्वर म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, जयवंत देशमुख, जयंत भगत, विश्वनाथ कोळी, सुभाष भगत, योगिता भगत, सुहास भगत, सुधीर ठाकूर, अरुण ठाकूर, अनुप भगत, विजय भगत, समीर भगत, रामचंद्र म्हात्रे, कृष्णा गोवंडी, संध्या मुंबईकर, निर्मला गोंधळी, हरेश म्हात्रे, कमलाकर देशमुख यांच्यासह ग्रामस्थांनीही अभिवादन केले.

# बाधित झाडांच्या भरपाईसाठी 620 एकर जागेची गरज

## मीरा-भाईंदर महापालिकेचे एमएमआरडीएला पत्र

**भाईंदर, दि. ८ : प्रतिनिधी**

भाईंदर मेट्रो कारशेड डोंगरीच्या डोंगरावर बांधण्यासाठी तब्बल पावणे दोनशे एकर जागा आरक्षित करत १२ हजार ४०० झाडे झाडे काढण्याचा प्रस्ताव एमएमआरडीएने दिला आहे. दुसऱ्या टप्प्यातील ९ हजार ९०० झाडे काढण्यावरून शहरात विरोध होत असताना मीर भाईंदर महापालिकेने देखील भरपाई म्हणून १ लाख झाडे लावण्यासाठी ६२० एकर इतकी जागा लागणार असल्याचे सांगत अनेक मुद्द्यांवर माहिती मागितली आहे.

मीरा भाईंदर मेट्रोचे शेवटचे मेट्रो स्थानक भाईंदर पश्चिमेस राधास्वामी सत्संग व सुभाषचंद्र बोस मैदान दरम्यान येते. मात्र कारशेड तिकडून सुमारे ७ - ८ किमी लांब डोंगरीच्या नैसर्गिक डोंगरावर मंजूर केली आहे. त्यासाठी १२ हजार ४०० झाडे काढण्याचा प्रस्ताव एमएमआरडीएने दिला आहे. वास्तविक शेवटच्या स्थानकाजवळ खाजगी बिल्डर, राधा स्वामी सत्संग, डीबी रियालिटीसह मिठागरच्या मोकळ्या जमिनी आहेत. तर मुर्धा - राई गावामागील मोकळ्या ३२ हेक्टर जागेत टाकलेले मेट्रो कारशेडचे आरक्षण स्थानिक संघटनेच्या विरोधनंतर रद्द केले गेले होते, असे मुद्दे उपस्थित केले गेले आहेत.

डोंगरी येथील कारशेडसाठी तब्बल ७० हेक्टर म्हणजेच पावणे दोनशे एकर इतकी जागा आरक्षित केली गेली आहे. वास्तविक कारशेडसाठी इतकी जागाच कशाला लागते. मुंबईतील कांदिवली, आरे, अंधेरी येथे कारशेड असून नव्याने ठाणे-घोडबंदर मार्गावर आणि अन्यत्र कारशेड होत आहेत. त्याचा वापर करण्याचा पर्यायही पर्यावरणप्रेमींनी सुचवला आहे. उत्तन - डोंगरी भागातील डोंगर परिसर आणि त्यातील दाट झाडे ही मीरा भाईंदर शहराच्या ऑक्सिजनचे मुख्य स्रोत आहेत. शहरातील वाढते प्रदूषण आणि वाढते तापमान रोखण्यासाठी ही झाडे आवश्यक आहेत. येथील वन्यपक्षी, प्राणी यांचे वास्तव्य पाहता झाडे तोडू नका, अशी मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे.



दरम्यान, यापार्श्वभूमीवर सूर्या पाणी पुरवठा योजनेतील ९ हजार ९०० झाडे काढण्याच्या सुनावणीनंतर महापालिका उपायुक्त कल्पिता पिंपळे यांनी एमएमआरडीएचे कार्यकारी अभियंता सचिन कोठावळे यांना पत्र पाठवून काही मुद्द्यांवर माहिती देण्यास सांगितली आहे. ९ हजार ९०० झाडे काढण्याच्या बदल्यात भरपाई म्हणून १ लाख झाडे लावावी लागतील व त्यासाठी ६२० एकर जमीन लागेल. एमएमआरडीएने कारशेड बनवण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या मागील जागा व मुर्धा, राई गावाच्या मागिल जागा निश्चित केलेल्या जागेवर कारशेड न बनवता डोंगरी येथे कारशेड का बनवत आहे ?, असे प्रश्न उपस्थित करत पिंपळे यांनी एमएमआरडीएला याची माहिती देण्यास सांगितली आहे.

झाडांचे सर्वेक्षण करताना बाधित होणारी झाडे जास्त असून प्रत्यक्षात कमी झाडांना मार्किंग केलेले आहे ?. बाधित होणाऱ्या झाडांवर पक्षांची घरटे आहेत किंवा कसे याबाबत स्वयंमस्पष्ट अहवाल देणे ?. हेरिटेज झाडांचा उल्लेख आलेला नाही. हेरिटेज झाड तोडण्याची परवानगी घेतली नाही. आदी मुद्द्यांवर सविस्तर माहिती त्वरीत मिळावी. जेणेकरून हरकतदार यांनी सुनावणी दरम्यान घेतलेल्या हरकतीवर योग्य तो निर्णय घेता येईल, असे उपायुक्त पिंपळे यांनी एमएमआरडीएला दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

याआधी पहिल्या टप्प्यातील १ हजार ४०६ झाडांसाठी नुकसान भरपाई म्हणून ठरावानुसार महापालिकेने २० कोटी ७७ लाखांचा निधी जमा करण्यास सांगितले होते. मात्र, एमएमआरडीएने त्यास नकार देत आधी रक्कम कमी करावी अशी भूमिका घेतली होती. नंतर मात्र महापालिका स्वतःसाठी जे धोरण ठरवते त्यानुसार वास्तव खर्च घ्यावा, असे पत्र एमएमआरडीएने दिले होते.

सदर प्रकल्पाची किंमत कशामुळे वाढली आहे ?. कारशेड बनवणेकामी झाडे काढण्याचे काम दोन टप्प्यात घेण्याचे कारण काय ?. पर्यावरणीय परिणामांचा आराखडा सादर करणे. वड, पिंपळ याबाबत उच्च न्यायालयाचे आदेश असुन वृक्षतोडीवर निर्बंध करण्यात आलेला आहे. स्थानिक नागरिकांना विश्वासात घेण्यात आलेले नाही. यावरून एमएमआरडीएच्या एकंदरीत कारभारावरच पर्यावरणप्रेमींकडून आक्षेप घेण्यात आला आहे.

कारशेड बनवण्यासाठी प्रथम ३१ हेक्टर नंतर १० हेक्टर स्टाफ़ला राहण्यासाठी व अतिरीक्त १८ हेक्टर फ्युचर डेव्हलपमेंटसाठी जागा घेण्याचे कारण काय?. कारशेडसाठी पर्यायी जागेचा शोध घेणे. मेट्रो कारशेड अंडरग्राऊंड बनविणे. ठाणे, आरे-गोरेगाव येथील कारशेडचा वापर करावा, असेही पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे.

# आशिष रॉड्रिग्ज यांचा मृत्यू!

## ⏭ अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात चालकाविरोधात गुन्हा दाखल

## ⏭ राजोडी समुद्रकिनारीच्या रस्त्यांवरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

**विरार, दि. ८ : प्रतिनिधी**

भरधाव मोटरसायकलने धडक देत पादचाऱ्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या चालकाविरोधात अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) 2023 च्या 106 (1), 281, 125 (अ), 124 (ब) आणि महाराष्ट्र मोटर वाहन नियम 1989च्या 184 व 187 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अपघात शुक्रवार, 2 मे रोजी सायंकाळी नालासोपारा-राजोडी समुद्रकिनारी घडला असून; या अपघातात येथील स्थानिक रहिवासी आशिष रॉड्रिग्ज (86) यांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी त्यांचा मुलगा स्टनी रॉड्रिग्ज यांनी फिर्याद दिल्यानंतर अर्नाळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

राजोडी येथे राहणारे आशिष रॉड्रिग्ज (86) शुक्रवारी संध्याकाळी 7.45 वाजण्याच्या सुमारास येथील आरोग्य माता चर्च येथे प्रार्थनेसाठी गेलेले होते. प्रार्थनेवरून घरी परतत असताना रस्त्यात त्यांना त्यांच्या ओळखीचे ऑल्विन जोसेफ रॉड्रिग्ज यांनी त्यांना हाक दिल्याने रस्त्याकडेला उभे राहून दोघे बोलत होते. दरम्यानच्या काळात अर्नाळा बाजूकडून राजोडीकडे जाणाऱ्या भरधाव मोटरसायकलने (क्र. एमएच-04-डीएच-1107) त्यांना धडक दिली. या अपघातात आशिष रॉड्रिग्ज यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांच्या डोक्यातून व कानातून रक्तस्राव झाल्याने ते जागेवरच बेशुद्ध पडले. त्यांचे सहकारी ऑल्विन जोसेफ रॉड्रिग्ज यांनी त्यांना सावरतानाच; मोटरसायकल चालकाला आवाज देऊन थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु मोटरसायकल चालकाने त्यांच्याकडे दुर्लक्ष करून तेथून पळ काढला. त्यामुळे ऑल्विन यांनी अपघाताबाबतची माहिती त्यांचा मुलगा स्टनी याला दिली. नंतर ऑल्विन व स्टनी या दोघांनी आशिष यांना उपचारार्थ विरार (प.) येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील कर्तव्यावरील डॉक्टरांनी त्यांना तपासून रात्री 9 च्या सुमारास मृत घोषित केले होते, अशी माहिती स्टनी रॉड्रिग्ज यांनी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात दिली होती. या माहितीनुसार अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

अधिकच्या तपासात आशिष रॉड्रिग्ज यांना धडक देणाऱ्या मोटरसायकलस्वाराच्या गाडीचे इन्शुअरन्स, पीयूसीची कालमर्यादा संपलेली असल्याची माहिती पुढे आली आहे. सदर गाडीची नोंद दुसऱ्याच्या नावाने असून, चालकाकडे परवानाही नाही. मोटरसायकलस्वाराने मद्यधुंद अवस्थेत उलट दिशेने येऊन आशिष रॉड्रिग्ज यांना धडक दिलेली होती. पोलिसांनी त्याला फरार घोषित केले आहे, मात्र त्याचा शोध घेऊन तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी स्टनी रॉड्रिग्ज आणि त्यांच्या कुटुंबियांची आहे.

दरम्यान; या अपघातामुळे राजोडी समुद्रकिनारीच्या रस्त्यांवरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मागील दोन महिन्यांतील हा सहावा अपघात आहे. सुरक्षेच्या दृष्टीने या रस्त्यावर दुभाजक असावेत, अशी मागणी सातत्याने पुढे आलेली असताना संबंधित प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत असल्याच्या स्थानिक रहिवाशांच्या तक्रारी आहेत.

# आमदार राजन नाईक यांचे आंदोलन स्थगित

**वसई, दि. ८ : प्रतिनिधी**

वसई विरार महानगरपालिकेच्या रखडलेल्या विकास कामांबद्दल तसेच वाढीव पाणीपट्टी व घरपट्टीच्विरोधात आमदार राजन नाईक यांनी गुरुवार दिनांक 8 मे रोजी पुकारलेले धरणे आंदोलन आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या लेखी आश्वासनानंतर तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. आमदार राजन नाईक यांनी केलेल्या लोकहिताच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून लेखी आश्वासन आयुक्तांनी दिले आहे. आमदार राजन नाईक यांनी वसई विरार परिसरातील नागरी समस्या सोडवण्यासाठी तसेच वाढीव पाणीपट्टी, घरपट्टीबाबत व कार्यक्षेत्रातील रखडलेल्या विविध विकास कामांबाबत महापालिका वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करून दिनांक 2 मे रोजी आयुक्तांना धरणे आंदोलनाबाबत लेखी पत्र दिले होते. त्या अनुषंगाने गुरुवार दिनांक ८ मे रोजी वसई विरार महानगरपालिका मुख्यालयासमोर भारतीय जनता पार्टीतर्फे धरणे आंदोलन करण्यात येणार होते. मात्र, राजन नाईक यांनी केलेल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून वसई विरार महानगरपालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सर्व मागण्याचे सकारात्मक विचार करण्याचे लेखी आश्वासन दिल्यामुळे आमदार राजन नाईक यांनी गुरुवार दिनांक आठ मे रोजी पुकारलेले धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे. वसई विरार महानगरपालिकेने दिलेल्या लेखी आश्वासनाप्रमाणे कार्यवाही न केल्यास आगामी काळात आंदोलन केले जाईल असे देखील राजन नाईक यांनी यावेळी सांगितले. आयुक्त अनिलकुमार पवार यांनी आमदार राजन नाईक यांना दिलेल्या लेखी पत्रामध्ये मालमत्ता कर व पाणीपट्टी कर यामध्ये होणारी प्रस्तावित वाढ स्थगित करण्यात आलेली आहे. त्या संदर्भात सर्वपक्षीय समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या निर्णयानुसार पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल. ,ज्या लोकांनी वॉटर सोर्स डेव्हलपमेंट चार्ज यापूर्वी 100% भरला असेल त्यांच्याकडून पुन्हा शुल्क आकारला जाणार नाही. निविदा स्वीकृती दरम्यान जे निविदाधारक माघार घेतात किंवा अनामत रक्कम भरत नाहीत अशा ठेकेदारांवर ब्लॅक लिस्टची कार्यवाही करण्याकरता शासन निर्णय व परिपत्रकामध्ये सूचना आढळून येत नाहीत याकरता याबाबत शासन स्तरावर मार्गदर्शन मागवण्यात येत आहे. शहरातील विविध भागातील विकास कामे मालमत्ता कराच्या किमान 75 टक्के महानगरपालिकेकडे जमा झाल्यानंतर मंजूर करण्यात येत होती.

# वादळी वाऱ्यामुळे कल्याण परिमंडलात महावितरणचे 92 लाखांचे नुकसान

**कल्याण, दि. ८ : प्रतिनिधी**

गेल्या दोन-तीन दिवसांमध्ये वादळी वाऱ्यांसह झालेल्या अवकाळी पावसाचा मोठा फटका कल्याण परिमंडलातील वीज वितरण यंत्रणेला बसला आहे. या वादळामुळे २४१ विजेचे खांब, ५ रोहित्र व १८ किलोमीटर वीजवाहिन्या जमीनदोस्त होऊन जवळपास ९२ लाख रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. विपरित परिस्थितीतही युद्धस्तरावर दुरुस्तीचे काम करून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.



कल्याण मंडल एक कार्यालयांतर्गत डोंबिवली, कल्याण पूर्व आणि पश्चिम भागात एक खांब कोसळला असून चार ठिकाणी वृक्षांच्या फांद्या पडल्याने वीज वाहिन्यांचे नुकसान झाले. कल्याण मंडल दोन कार्यालयांतर्गत उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड, शहापूर, टिटवाळा तसेच ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात उच्चदाबाचे ४ खांब व लघुदाब वाहिनीचे ६५ खांब कोसळले व ४ किलोमीटर वीजतारा तसेच १ रोहित्र कोसळण्यासोबतच ४ रोहित्र नादुरुस्त झाले होते.

वसई मंडल कार्यालयांतर्गत वसई, विरार, वाडा, नालासोपारा, आचोळे भागात उच्चदाब वाहिनीचे १४ खांब व लघुदाब वाहिनीचे २७ खांब तसेच एक रोहित्र जमिनदोस्त होण्यासोबतच दोन रोहित्र नादुरुस्त झाले. पालघर मंडल कार्यालयांतर्गत पालघर, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, बोईसर भागात उच्चदाब वाहिनीचे ५४ तर लघुदाब वाहिनीचे तब्बल ७६ खांब पडले. उच्चदाबाच्या ९.५ किलोमीटर वीजवाहिन्या आणि लघुदाबाच्या ७.६ किलोमीटर वीजवाहिन्या कोसळल्या. एकूण तीन रोहित्र जमिनदोस्त होण्यासह ५ रोहित्र नादुरुस्त झाले व ४ उपकेंद्रामंधील वीज वितरण उपकरणांत बिघाड झाला.

मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली अधीक्षक अभियंते, सर्व कार्यकारी अभियंते, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदाराचे कामगार फिल्डवर राहून अथक काम करीत होते. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही कमी कालावधीत वीजपुरवठा सुरळीत करणे शक्य झाले.

# बदलापूर पालिका कर्मचाऱ्यांचे लेखा विभागात ठिय्या आंदोलन; उशीरा पगारामुळे तीव्र नाराजी



**बदलापूर, दि. ८ प्रतिनिधी**

उल्हासनगर महापालिकेतून बदली होऊन बदलापुर नगरपालिकेत लेखाधिकारी असलेले विकास चव्हाण यांनी मनमानी सुरु केली असुन कर्मचाऱ्यांचे देणे देण्यासाठी कुणालाही विश्वास बसणार नाही असे कारण सांगून त्यांची दिशाभूल करत आहे. विकास चव्हाण हे कंत्राटदार यांचे देयके मंजुर करतात, परंतु नगरपालिका कर्मचारी यांचे वेतन देण्यासाठी पैसे नाहीत असे सांगुन कर्मचाऱ्याबना वेठीस धरण्याचे काम करत आहेत. या बाबत विकास चव्हाण यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी शासनाचे अनुदान येण्यास विलंब होत असल्याने वेतन देण्यास विलंब झाल्याचे सांगितले आहे .

कुळगाव बदलापूर नगरपालिकेत गेल्या चार महिन्यांपासून वेतन वेळेवर मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी होत आहे. त्यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी पालिकेच्या लेखा विभागात ठिय्या मांडून पालिका प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

भारतीय कामगार कर्मचारी महासंघाचे युनिट अध्यक्ष विनोद वाल्मिकी यांच्या नेतृत्वाखाली कुळगाव बदलापूर नगर परिषदेत ठिय्या आंदोलन करण्यात आले. विनोद वाल्मीकी व नगरपालिकेतील कर्मचारी यांनी वेळेवर वेतन मिळत नसल्याचे कारण विचारण्यासाठी लेखा विभागात गेले. परंतु, मुख्य लेखाधिकारी विकास चव्हाण हे दालनात नसल्याने संतप्त कर्मचाऱ्यांनी लेखा विभागात ठिय्या मांडला होता . पूर्वी आम्हाला दर महिन्याच्या १ तारखेला वेतन मिळत होते . परंतु, गेल्या चार ते पाच महिन्यांपासून वेतनाची तारीख लांबत चालली आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी गृहकर्ज घेतले आहे. परंतु, गेल्या चार महिन्यांपासून पगार या तारखेत होत नसल्याने कर्मचाऱ्यांचे कर्जहफ्ते थकल्यामुळे विनाकारण बँकेचा भुर्दंड भरावा लागत असल्याचे सांगितले.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
Email:panvelcorporation@gmail.com

जावक क्र. पमपा/मल.वि/५०२५/प्र.क्र.०१/६१०/२०२५ — दिनांक :- ०८/०५/२०२५

### जाहिर सुचना
### मलनि:स्सारण विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने मलनि:स्सारण विभागातील खालील कामांचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत उत्पादकांकडुन (Manufacturer) वेगवेगळ्या बार्बीचे दर मागविण्यात येत आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नवीन पनवेल (पुर्व) सेक्टर-१५ येथील हॉल्डींग पाँड आणि स्टॉर्म वॉटर पंपीग स्टेशनमध्ये सुधारणा करणे.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सही/-
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.१९५/२००/२०२५
दिनांक :- ०८/०५/२०२५



## वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स: ०२५० २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./बांध/ शअ/२६४/२५
दिनांक : ०८/०५/२०२५

### जाहिर ई-निविदा सुचना क्र. ०८ करीता व्दितीय मुदतवाढ

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खालील कामांकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने ४ कामांची ई-निविदा सुचना https://Mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जा.क्र.वविशम/बांध/शअ/५९/२०२५ दि.१५/०४/२०२५ अन्वये प्रसिध्द करून दि.१६/०४/२०२५ ते दि.३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन मागविण्यात आल्या होत्या. तसेच जा.क्र.वविशम/बांध/शअ/१४४/२०२५ दि.२८/०४/२०२५ अन्वये सदर कामाकरीता प्रथम मुदतवाढ दि.०६/०५/२०२५ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत देण्यात आली होती. सदर कामांकरीता खालील प्रमाणे व्दितीय मुदतवाढ देण्यात येत आहे.

**व्दितीय मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे.**

१. ऑनलाईन ई-निविदा स्विकृतीची अंतीम दिनांक :- १४/०५/२०२५ दु.३.०० वाजेपर्यंत
२. ऑनलाईन ई-निविदा उघडण्याची दिनांक :- १६/०५/२०२५ दु.३.०० वाजेपर्यंत

सही/-
(प्रदीप पचंगे)
प्र. शहर अभियंता
वसई विरार शहर महानगरपालिका

जावक क्र.व.वि.श.म./मा.व.ज./१८८/२०२५
दिनांक: ०८/०५/२०२५



## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- https://kbmc.gov.in

जा.क्र : कुबनप/विद्युत/२०/२०२५-२६ — दिनांक:- ०८/०५/२०२५

### जाहिर ई- निविदा सुचना क्र. ०६/२०२५-२६

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या विद्युत विभागामार्फत ०४ कामासाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ९/५/२०२५ ते दि. १६/५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा शक्य झाल्यास दि.१९/५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद
कुळगांव

एक चिमूटभर कुंकवाची कींमत काय असते, हे पाकीस्तानला आता पुरेपूर समजले असेल. पाकला धडा शिकविणार असे बोलले जात होते, पण ते कधी? याचे उत्तर सरकारने अतिशय कठोरपणे दिले. भारतीय सैन्यदलाने अत्यंत नियंत्रित, योजनाबध्द, परिणामकारक हल्ले करून अतिरेक्यांना योग्य तो धडा शिकविला. यासाठी भारतीय लष्कराचे मनःपूर्वक अभिनंदन केलेच पाहिजे. संपूर्ण जगाला, सर्व माध्यमांना आणि देशालाही मॉक ड्रिल च्या बातमीत दंगवून ठेवून, कुठलीही पुसटशी शंका येऊ न देता ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून दाखवले आहे. ज्या यंत्रणेला, व्यवस्थेला पहेलगामसाठी जबाबदार धरले, इंटलीजन्स फेल्यूर म्हणून टिका केली बहुतांश त्याच यंत्रणानी समन्वय साधून आत घुसून मारले आहे. अर्थात यातून पाकिस्तान धडा शिकेल असे होणार नाही. तसे असते तर फाळणी किंवा १९७१ च्या वेळीच पाकिस्तानने कारवाया थांबवल्या असत्या. मात्र, ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानसह पाक समर्थक देश ज्यात चीन आहे त्यांनाही सूचित केले आहे. विशेष म्हणजे रात्री एअर स्ट्राईक झालेल्या ऑपरेशन 'सिंदूर'च्या नावाचे लॉजिक बघा. पहेलगाम आतंकवादी हल्यात शहीद झालेले सर्व पुरुष होते. त्यामुळे आपल्या बहिणीचं सिंदूर पुसलं गेले. त्यामुळे या ऑपरेशनचं नावं 'सिंदूर' ठेवण्यात आलं. तसेच या ऑपरेशनला लीड केल ते म्हणजे विंग कमांडर आणि कर्नल ह्या दोघीही महिला अधिकारी. विंग कमांडर व्योमिका सिंह आणि कर्नल सौफिया कुरेशी होय. दिनांक सात मे बुधवार पहाट उजाडली ती ३घुसकर३ मारल्याच्या बातमीने. भारतीय वायूसेनेच्या शूर सैनिकांनी मध्यरात्री नंतर आणि पहाटेपूर्वी पाक व्याप्त काश्मीरसह पाकिस्तानात नऊ ठिकाणी जोरदार हल्ला केल्याची बातमी जगभर प्रसिद्ध झाली. पाकिस्तानातील भारत विरोधी कारवाया करणारी ठिकाण उध्वस्त करून जिहादी दहशतवादाविरुद्ध युद्ध असेच लढावे लागते असा संदेश जगाला दिला आहे. या हवाई हल्ल्याचे नाव ऑपरेशन सिंदूर ठेवून देशाच्या अंतर्गत आणि बाह्य शत्रूना नेमका इशारा दिलेला आहे. कपाळावर लावल्या जाणाऱ्या कुंकू, टिकलीचे अनन्य साधारण महत्व घुसून नऊ ठिकाणी हल्ले चढवून अधोरेखित केले आहे. पहेलगाम येथे पर्यटक म्हणून नव्हे हिंदू म्हणून गोळ्या मारून ठार करून कुंकू पुसले होते. ज्या हिंदू भगिनींचे कुंकू पुसले त्यांना ३मोदींना जाऊन सांगा३ असे सांगितले होते. दिनांक बावीस एप्रिल रोजी जिहादी हल्ला करून भारताला आव्हान दिले होते. दिनांक सात मे च्या पहाटे सुमारे शंभर किलोमीटर घुसून त्या आव्हानाला जोरदार प्रत्यत्तर दिले आहे. कुंकवाचे मोल पाकिस्तानसह जगाच्याही लक्षात आणून दिले आहे. सौभाग्यलंकार असलेले कुंकू ही हिंदूपणाची ओळख आहे. साजशृंगारत स्थान असलेल्या कुंकू ही अस्मिता आहे. त्या कुंकवार प्रहार करून जो कर सकते हो करो, उखाड लो असे सांगणाऱ्या जिहादला कुंकू कायमचे लक्षात राहिल असा तडाखा दिला आहे. या लढाईत दोषींना सोडायचं नाही आणि निरपराधांना मारायचं नाही ही भारतीय परंपरा आपल्या लष्करानं कायम राखली ही अभिमानास्पद बाब आहे. आपल्या छातीवर गोळ्या झेलून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणा?या भारतीय सैन्यदलावर प्रत्येक भारतीयाचा पूर्ण विश्वास आहे. आज तोच विश्वास सार्थ ठरवत, भारतीय हवाई दलाने मध्यरात्री दीडच्या सुमारास अतिरेक्यांच्या नऊ ठिकाणांवर यशस्वी एअर स्ट्राईक करून, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला. या कारवाईत पाकिस्तानी नागरिक किंवा पाक लष्कराच्या कोणत्याही ठिकाणाला धक्का न लावता, अतिरेक्यांच्या नऊ लक्ष्यांवर अचूक आणि नियोजित हल्ला करण्यात आला. भारतीय सैन्याच्या या शौर्यपूर्ण कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान आहे.






# 'एक चुटकी सिंदूर की किमत' पाकीस्तानला समजली!

भारताचे सार्वभौमत्व आणि नागरिकांची सुरक्षा अबाधित राखून तसेच पहलगाम हल्ल्याला योग्य प्रत्युत्तर देण्यात आले. ऑपरेशन सिंदूर हा भारतीय सेना आणि वायुसेनेच्या एकतेचा आणि सामर्थ्याचा दैदिप्यमान पुरावा आहे. कर्नल सोफिया कुरैशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांना पुढे आणून भारताने केवळ पाकिस्तानच्या द्वेष पसरवणाऱ्या शक्तींनाच नव्हे, तर देशातील मुस्लिम आणि शीख समाजाविरुद्ध द्वेष पसरवणाऱ्यांना सणसणीत उत्तर दिले आहे. ही खरोखर अभिमानास्पद आणि प्रेरणादायी घटना आहे, जी आपल्या देशाच्या अखंडतेचा आणि सर्वसमावेशकतेचा जयघोष करते.

देशातील जनता सरकारच्या पाठीशी ठाम उभी राहिली. सर्व राजकीय पक्ष देखील मतभेद विसरून मोदींच्या पाठीमागे उभे राहिले. केवळ माझा मुलगा नाही, तर कोणाचा मुलगा, भाऊ, पप्पा, काका किंवा नवरा इतर कोणीही नातेवाईक बॉर्डरवर देशाच्या रक्षणासाठी लढाईसाठी उभा असेल, तर त्यांना प्रोत्साहन मिळेल अशी वातावरण निर्मिती देशात उभी राहिली आहे. देश हितासाठी घेतलेल्या निर्णयाला समर्थन देतांनाच चुकीला चूक म्हणणं हे गरजेचे आहे. खरं तर अशाप्रकारे लपून-छपून केलेल्या पहलगाम हल्ल्याचे समर्थन कोणीही करू शकत नाही. खऱ्या अर्थाने हल्ल्यामध्ये शहीद झालेल्याना न्याय मिळणे गरजेचे होते.

भारत सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागतच केले पाहीजे. हे लक्षात ठेवावं की अशा प्रकारचे हल्ले किंवा अशा प्रकारे युद्ध हे देशांमध्ये पहिल्यांदा होत नाही. यापूर्वी सुद्धा युध्द झाले होते. त्यासाठी त्या त्या सरकारने सडेतोड उत्तर हे पाकिस्तानला प्रत्येक वेळा दिलेच? आहे. पण पाकिस्तान सुधारण्याचे नाव घेत नाही व त्याची किंमत त्यांना मोजावीच लागली. काहींनी या घटनेवरही राजकारण केले. कोण होते ते लोक? जे फेसबुक, ट्विटरवर बसून हिंदू-मुस्लिम करत होते, जे एका विशिष्ट धर्मावर बोट ठेवून समाजात जाणीवपूर्वक फूट पाडत होते, ते तुमच्या आमच्यातलेच आहेत. आपल्या कॉलनीत, व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये, ऑफिसमध्ये चेहऱ्यावर देशप्रेमाचा मुखवटा आणि मनात जातीय विखार ठेवणारे लोक देशाच्या दृष्टिकोनातून घातक ठरतात. आज आपल्यासारख्यांनी जर त्यांना ओळखलं नाही, तर उद्या आपलं मौनच देशासाठी घातक ठरेल.

धर्माच्या नावावर देश फोडण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना जोरात उत्तर दिले पाहिजे. कारण हल्ला दहशतवाद्यांनी केला होता, पण समाज तोडण्याचं काम या देशद्रोह्यांनी सुरू केलं होतं. परंतु जनतेनेच ओळखलं की, प्रथम देश व नंतर धर्माच्या बाता करू या. पाकिस्तानच्या विरोधात भारतीय विमानांनी घिरट्या घातल्या. पण आपल्या लेकीबाळी वैमानिक म्हणून काम करीत होत्या. त्यावेळी प्रचंड अभिमान वाटत होता. आपल्या भारताच्या लेकींनी कसे दिवस काढले, हे सर्वांनाच माहीत आहे.

जिला कपाळावर टिकली नाही म्हणून खिजवलं गेलं, जिला सर्वसामान्य जगणं, शिक्षण आणि समाजात काम करण्याची परवानगी देखील नाकारली गेलेली, जिला बायकांची अक्कल चुलीपुढेच म्हणून हिणवलं गेलं, जिला तिच्यावर होणाऱ्या बलात्कारासाठी तिलाच जबाबदार धरलं गेलं. आज त्याच लेकींनी रणांगणात भाग घेतला. महिलांनी जर का मनावर घेतलं तर त्या काहीही करू शकतात, या स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधींच्या प्रेरणेतून यापूर्वीच दिसले आहे.

भारतीय सेना दलाच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंगकमांडर व्योमिकासिंग यांनी ऑपरेशन सिंदूर बद्दल प्रेस कॉन्फरन्स घेतली. इंडियन एअर फोर्सने दहशतवादी अड्ड्यावर केलेल्या जाँबाज हल्ल्याची सविस्तर माहिती या दोघींनीच दिली, त्यावेळी संपूर्ण देशाला अभिमान वाटत होता.

पाकला जबरदस्त उत्तर देण्यासाठी केलेल्या हल्ल्याचे सिंदूर असे केलेले नामकरण वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. समाज माध्यमातून व्यक्त होणारे पुरोगामी, सेक्युलर, लिबरल, न्यू - लेफ्ट, वोक माध्यमकर्मी, कलाकार, साहित्यिक आणि त्यांच्या नादी लागलेले या सिंदूर नावाची टिंगल करतील हे नक्की. युद्धसदृश्य हल्ल्याचे असे नाव असू शकते हे त्यांच्या बुद्धीला न झेपणारे आणि त्यांच्या विचारांना न पटणारे असल्यामुळे ते सिंदूर, कुंकू, टिकली याची खिल्ली उडवतील. पण, पहाटेच्या बातमीने सुखावलेले देशबांधव ऑपरेशन सिंदूरची उपयुक्तता जाणून आहेत.

आता देशातील नागरिक देखील जागृत झाले आहे. समाज माध्यमातून तेच एकमेकांना संदेश पाठवीत आहे व त्यात म्हणतात की, युद्धाच्या शक्यतेमुळे रजेवरचे सैनिक सीमेवर निघालेत. कोणत्याही प्रकारच्या वाहनात स्वतः उठून त्यांना बसू द्या. रिझर्वेशन म्हणजे मालकी नव्हे.

ते आहेत म्हणून मी आहे ही जाणीव असली तर हे नकळत घडेल. त्यांनी टॉयलेटजवळ, पायरीवर, दरवाजात वा पायदळी बसणं योग्य नाही. ते देशाचा अभिमान आहेत, रक्षक आहेत. तुम्ही बसायला द्या, ते तुम्हांला जगायला देतील. नंतर सीमेवर उभं रहायचंय म्हणून आत्ता बसू द्या. ट्रेन, बसपर्यंत जायला चालत असतील तर आपल्या गाडीत घ्या. तुम्हाला ते बसायला सीट देणार नाहीत. पण तुमच्यासाठी ते प्राण देतील. अशा प्रकारच्या संदेशाची देवाण-घेवाण सुरू झाली आहे.

■ ■ ■

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

## महाराजांचे ऑपरेशन सुरत आणि मोदिंचे ऑपरेशन सिंदूर

छ. शिवाजी महाराजांनी सुरतेवर केलेला हल्ला आणि आज भारताने सीमेजवळ पार पाडलेले ऑपरेशन सिंदूर या दोन्ही मध्ये विलक्षण साम्य आहे. मराठे सुरतेवर हल्ला करणार अशी आवई बहिर्जी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उठवून दिली आणि सुरतेत घबराट उडेल याची काळजी घेतली. या भीतीपोटी तेथील मोठ्या व्यापाऱ्यांनी त्यांची अफाट धनसंपत्ती सुरक्षिततेसाठी हलवून कुठे लपवून ठेवली आहे याची इत्यंभूत माहिती बहिर्जींनी गोळा करून ठेवली. त्यामुळे महाराजांच्या सैन्याने जेव्हा सुरतमध्ये प्रत्यक्ष प्रवेश केला, तेव्हा त्यांना हे धन कुठे लपवून ठेवले आहे हे अचूक माहिती होते आणि त्यांनी कमीतकमी वेळात आपले काम पूर्ण केले. गेले अनेक दिवस भारत हल्ला करणार या आवईने पाकिस्तानची भीतीने गाळण उडालेली संपूर्ण जगाने पाहिली, पण भारत प्रत्यक्ष हल्ला करतच नव्हता. मधल्या काळात या संभाव्य हल्ल्याच्या भीतीने बहुतेक सगळे दहशतवादी गट आणि बहुदा त्यांचे नेतेदेखील पाकिस्तानमधल्या त्यांच्या त्यांच्या मुख्यालयात पुढील तयारीसाठी जमा झाले. त्या सर्वांना तिथे पोहोचण्यासाठी पुरेसा वेळ देऊन मगच भारताने ऑपरेशन सिंदूर लॉन्च केले आणि कमीतकमी वेळात या दहशतवादी तळांचे जास्तीतजास्त नुकसान भारत करू शकला आहे. या सर्जिकल स्ट्राइकमध्ये काही कुप्रसिद्ध दहशतवादी गटांचे मुख्य तळ नष्ट झाले आहेत हे महत्त्वाचे. बाष्कळ बडबड करत, बढाया मारणाऱ्या असीम मुनीरचा इनायत खान झाला आहे. सुरतेचा सुभेदार आणि औरंगजेबाचा नातेवाईक असणाऱ्या इनायतखानाची तेव्हा जी अवस्था झाली होती, आज तीच गत पाकिस्तानची आणि मुनीरची झाली आहे. छत्रपतीशिवाजी महाराजांची रणनीती कोणाला अचूक कळली आहे हे सुज्ञांस सांगणे न लगे!

## भारतीय लष्कराला त्रिवार वंदन करायला हवं

ऑपरेशन सिंदूर या नावात निरपराधांच्या हत्येबाबतचा सगळा क्षोभ दडलेला आहे. जा, मोदीको बोल या दर्पोक्ती विरुध्दचा संताप लपलेला आहे. अतिरेक्यांनी ज्या निष्पाप महिलांचं जीवन उद्धवस्त केलं त्या महिलांच्या मनातला संताप त्यात आहे आणि त्यांच्या असीम दुःखावर एक हलकीशी फुंकरही त्यात आहे. ही कारवाई शस्वीपणे पार पाडणाऱ्या भारतीय लष्कराला त्रिवार वंदन करायला हवं.

या हल्ल्याच्या संदर्भात फेसबुकवरील एका पोस्टमध्ये अमिताभच्या दीवार चित्रपटातल्या एका डायलॉगची आठवण करुन देण्यात आली आहे. तुम मुझे धुंड रहे हो पीटर, ओर मै तुम्हारा यहां इन्तजार कर रहा हुं..... या अमिताभच्या बोलण्यातला सगळा राग, त्वेष आणि आत्मविश्वास लोकांना कमालीचा रुचला होता. भारतीय लष्काराने पाकिस्तानला गुंगारा देऊन जो हल्ला केला त्यात या संवादाची थोडी झलक नक्की जाणवेल.

मोदी, शहा, राजनाथ, डोवाल यांनी मॉक ड्रीलचं असं काही बेमालूम जाळं उभं केलं की त्यात पाकिस्तान सरकार आणि लष्कर साफ फसलं. अगदी आग्र्याच्या कैदेतून आजारपणाची बतावणी करत गोरगरिबांना फळं आणि मिठाई पाठवणा-या शिवरायांच्या राजनीतीची आठवण झाली. शत्रूला गुंगारा देणारं गेल्या अनेक वर्षातलं हे सर्वेत्तम उदाहरण ठरावं. रोजच्या हल्ल्याच्या भीतीने झोप उडालेल्या पाकिस्तानी सैनिकांचा मॉक ड्रीलच्या बातमीमुळे जरा कुठे डोळा लागला आणि भारतीय लष्कराने बरोबर डाव साधला. याला म्हणतात रणनीती आणि ती प्रत्यक्षात उतरवणाऱ्या जवानांचं कोशल्य! असाच, अमेरिकेसारख्या महाशक्तीला चकित करणारा हल्ला जपानने दुसऱ्या महायुध्दात केला होता. ७ डिसेंबर, १९४१ रोजी जपानच्या अनेक पाणबुड्या अचानक पर्ल हार्बर या अमेरिकेच्या नाविक तळासमोर जमल्या. जपानमधून निघून व संपूर्ण पॅसिफिक ओलांडून या पाणबुड्या व नौका तिथं पोहोचल्या होत्या. सकाळी सातच्या सुमारास या पाणबुड्यांनी व जपानी नौकांनी जोरदार हल्ला केला. या हल्यात अमेरिकेची १८० विमाने नष्ट झाली आणि २४०० सैनिक मारले गेले.

प्रत्यक्ष हल्ला होईपर्यंत अमेरिकेला त्याची थोडीही चाहुल लागली नव्हती. या हल्ल्यात पाकिस्तानी अतिरेक्यांचा म्होरक्या अझर मसूद याचं सगळं कुटुंब गारद झालं ही आणखी एक आनंदाची गोष्ट.

भारतात झालेल्या अतिरेक्यांच्या अनेक हल्ल्यांचा अझर हाच सूत्रधार होता. २४ डिसेंबर १९९९ रोजी झालेल्या IC 814 या इंडियन एअरलाईन्सच्या विमानाच्या अपहरणानंतर अतिरेक्यांनी ओलीसांच्या बदल्यात याच अझर मसूदची तुरुंगातून सुटका करुन घेतली होती. आज त्याच्या डोळ्यादेखत त्याच्या कुटुंबातले १४ जण हल्ल्यात ठार झाले. या नराधमाची अशीच अवस्था करीपर्यंत भारताने गप्प बसू नये हीच कोट्यवधी भारतीयांची इच्छा आहे. देशात काही विसंवादी सूर निघत असले तरी संकटाच्या काळात सगळा भारत एक होतो हा आपला नेहमीचा अनुभव आहे.

■ भगवान दातार

## कुंकवाचाचा आकार लहान, त्यातील शक्ती महान

आपली प्रतिकं, आपल्या अस्मिता, आपले भावविश्व याचे मोल जाणणारे ऑपरेशन सिंदूरचे स्वागत करून त्या सव्वीस जणांच्या सांडलेल्या रक्ताची बूज राखतील. ऑपरेशन सिंदूर हा युद्धज्वर नाही. ऑपरेशन सिंदूर हे पहेलगाम हल्ल्याने अस्वस्थ, दुःखी आणि संतापलेल्या संपूर्ण देशाच्या भावनांचे नियोजनबद्ध, संयमी आणि पिनपॉईंटेड असे प्रकटीकरण आहे.

या सगळ्यातून पुढे काय होणार? हे पहावे लागेल.

याचे परिणाम केवळ आशिया खंडापुरते मर्यादित रहाणार नाहीत. जगाला या ऑपरेशन सिंदूरचा अर्थ समजून घेऊन भारताने जिहादी दहशतवादाविरुद्ध मानवकल्याणासाठी दीर्घकाळ चालवलेल्या युद्धात सहभागी व्हावे लागेल. जगात शांतता, मानवता, विविधता, लोकशाही आणि प्रत्येकाची आपली प्रतिक, अस्मिता, मानचिन्ह टिकवायची असतील तर ऑपरेशन सिंदूरचे पूर्ण समर्थन याला पर्याय नाही.

एक चुटकी सिंदूर की किमत आता नऊ ठिकाणच्या हल्ल्यानंतर लक्षात आली असेल. कुंकू, टिकलीचा आकार लहान असला तरी, त्यात शक्ती आहे याचा प्रत्यय आला असेल. अर्थात, अखंड सावधान हवी. आपला परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी यथाशक्ती पुढाकार हवा. सीमेवर लढणारे आणि घुसून मारणारे यांचे मनोबल उंचवण्याच्या प्रयत्नात आपला खारीचा वाटा हवा.

■ मकरंद मुळे

# घोड्यांच्या ट्रॅमचे युग समाप्त!

उत्तरार्ध

(कालच्या अंकावरून पुढे)

१९०७ साली ट्रॅमचे विद्युतीकरण झाले आणि ती किंग्ज सर्कल पर्यंत धावू लागली. तोपर्यंत ट्रॅमचे शेवटचे ठिकाण (टर्मिनस) दादरचे खोदादाद सर्कल होते. म्हणूनच ट्रॅम संपुष्टात येऊन इतकी वर्षे लोटली तरी खोदादाद सर्कलचे दादर टी. टी. हे नावं आजही कानावर येते; कारण दादर टी टी म्हणजे दादर ट्रॅम टर्मिनस होय. हे नाव आज ट्रॅम बंद पडली तरी वापरले जाते, नव्हे हेच नाव या भागाची ओळख आहे.

१२ डिसेंबर १९१० रोजी कुर्ला ते रे रोड दरम्यान हार्बर लाइन चालू झाली होती पण त्यात मुख्य त्रुटी म्हणजे ही लाइन रे रोड पर्यंतच होती, व्हिटी स्थानकाला जोडली नव्हती आणि विद्युतीकरणसुद्धा झाले नव्हते. तोपर्यंत प्रवाशांना रे रोड पासून बोरीबंदर अर्थात व्हिटीपर्यन्त अंतर कापण्यास याच ट्रॅम वापराव्या लागत.

३१ वर्षांत ससून डॉक, म्युझियम, वाडीबंदर, मध्य मुंबईत लालबाग, जेकब सर्कल, ताडदेव, ओपेरा हाऊस, ग्रँट रोड, जे.जे.हॉस्पिटल, धोबीतलाव, कर्नाक बंदर असे शहरभर ट्रॅमसेवेचे जाळे पसरले. आज जिथे माटुंग्याचे अरोरा चित्रपटगृह आहे, त्याच्यासमोर ट्रॅम संपत असे, तिथे एक अर्धवर्तुळाकार असा ट्रॅमचा मार्ग मुद्दाम ट्रॅमगाडीसाठी ठेवलेला असायचा, त्यावरून ट्रॅमचा चालक मोठ्या दिमाखाने ट्रॅम वळवून परतीच्या मार्गावर नेई आणि क्वचित आपल्या पायाखाली असलेला लोखंडी चकतीवजा टोल ठाण ठाण वाजवी.

ट्रॅमच्या या नव्वद वर्षांच्या इतिहासात मुंबई झपाट्यानं बदलली. वाढत्या औद्योगिकीकरणा बरोबरच विस्तारणाऱ्या मुंबई शहरात जलद प्रवासाच्या पर्यायाची मागणी पुढे येऊ लागली. ट्रॅमचा प्रवास वेळखाऊ आणि गैरसोईचा लोकांना वाटू लागला. ट्रॅम ताशी ५ किलोमीटर वेगाने धावत होती. शिवाय मोटारींसाठी ती अडचणीची ठरत होती. यामुळे जगभर ट्रॅमला पर्याय शोधण्याचे वारे वाहत होते. त्याऐवजी डिझेलवर चालणाऱ्या बस सेवेवर भर देण्यास सुरुवात झाली.

७ मे १९०७ रोजी सुरु झालेली विजेवर चालणारी ट्रॅम तारीख ३१ मार्च १९६४ पासून बंद करण्यात आली आणि जलद वाहतुकीसाठी बस गाड्यांना सर्वत्र रस्ते मोकळे झाले. पण तब्बल ९० वर्षे जिव्हाळ्याची ठरलेल्या ट्रॅमला मुंबईकरांनी वाजत गाजत निरोप दिला. शेवटची ट्रॅम बोरीबंदरहून दादरला रात्री दहा वाजता निघाली. तिला निरोप द्यायला प्रचंड गर्दी झाली होती. त्यामध्ये कंटक्टर होते बी.जी.घाटे. मुंबईकरांनी या कंडक्टरचे चक्क ऑटोग्राफ घेतले. एखाद्या कंडक्टरला असा मान पहिल्यांदाच आणि कदाचित शेवटचाच मिळाला असावा.

ट्रॅम बंद झाली आणि मुंबईकर हळहळला. ती अकरा नंबरची ट्रॅम तरी ठेवायला हवी होती. असं पुलं म्हणाले होते. सहा नंबरची ट्रॅम कुलाबा ते गिरगाव, फोरास रोडमार्गे धावत होती. खरंच ट्रॅमशी मुंबईकरांचं घट्ट नातं जोडलं गेलं होतं. एकेकाळी मुंबईची लाईफलाइन असलेल्या आणि पन्नास वर्षांपूर्वी इतिहासजमा झालेल्या ट्रॅमचे ट्रॅक हुतात्मा चौक परिसरात फेब्रुवारी २०१६ मध्ये खोदकाम करताना सापडले खरे, मात्र महापालिकेने नेमलेल्या कंत्राटदाराने सोमवारी सायंकाळी हे ट्रॅक सरळ उखडले.

हा प्रकार पाहून मुंबईचा जीव कळवळला. हे ट्रॅक आहे तिथेच जतन होऊ शकत होते, असे पुरातत्त्व विभागाचे म्हणणे असतानाही अत्यंत निर्दयीपणे हे ट्रॅक उखडून बेस्टच्या आणिक आगारातील म्युझियममध्ये जमा करण्यात आले. जगभरात नॅरो गेजच्या ट्रॅमसेवा आहेत, तर मुंबईत सापडलेले ट्रॅमचे ट्रॅक ब्रॉड गेजचे आहेत, जे जादा वीज खर्ची करणारे आणि प्रवासी क्षमता अधिकची असणारे असावेत. ट्रामचे हे रूळ १९६४ पूर्वीच उखडले जाणे अपेक्षित होते. मात्र काही कारणाने ते तसेच राहिले आणि मातीच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले, त्यावेळी ते जमिनीखाली गाडले गेले असावेत, असे मत या ठिकाणी उत्खनन करणाऱ्या निरीक्षकाने व्यक्त केले आहे.

ब्रिटिशकालीन मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे लोकप्रिय साधन म्हणून ट्रॅम ओळखली जायची. ससून डॉकपासून थेट किंग्ज सर्कलपर्यंत पसरलेल्या या ट्रामच्या जाळ्यापकी चार रूळ नुकतेच हुतात्मा स्मारक परिसरात रस्त्याचे काम चालू असताना सापडले. मात्र मुंबईतील ट्रॅमचे जाळे लक्षात घेता असे रूळ अनेक ठिकाणी आढळू शकतात.

यात ऑपेरा हाऊस, चनीरोड, गोल देऊळ, सीपी टँक, ताडदेव, बोरिबंदर- आत्ताचे मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस, जे.जे.रुग्णालय, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय आदी अनेक ठिकाणांचा समावेश आहे. येथील रस्त्यांवर खणल्यास तेथेही असे रूळ आढळू शकतात. मुंबईसारख्या शहरात सध्या वाहतुकीला पर्याय म्हणून ट्रॅम सुरू करणे शक्य नाही; पण ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी पुढे यायला हवे. सध्या मुंबईतील बेस्टच्या आणिक आगारात जुन्या ट्रॅमचे मॉडेल आजही पहायला मिळते, हे उल्लेखनीयच!

---

एन. कृष्णकुमार जी. गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
9423714883.

■ ■ ■

वाचक लिहितात

## कॅटचा निर्णय स्वागतार्ह!

कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स( कॅट) या भारतातील व्यापाऱ्यांच्या एका प्रमुख संघटनेने पाकिस्तान सोबत व्यापार बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. देशभरातील ४०,००० पेक्षा अधिक व्यापारी संघटना आणि त्यांचे ९ कोटीहून अधिक सदस्य व्यापारी यांचे प्रतिनिधित्व करणारी कॅट ही अग्रगण्य संघटना आहे. त्यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा निषेध व पाकिस्तान ला धडा शिकविण्याच्या उद्देशाने घेतलेला हा निर्णय स्तुत्य आहे. दहशतवादास खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तान ला सीमेवर उत्तर दिले जाईलच मात्र त्यासोबतच जनतेने त्यांच्या आर्थिक मुसक्या आवळणे हे देशांतर्गत प्रतिकाराचे नक्कीच प्रभावी पाऊल ठरेल, जेणेकरून कंगाल झालेला पाकिस्तान यापुढे भारतावर कोणताही हल्ला करण्याचा विचारही करणार नाही.

कॅट प्रमाणेच इतर क्षेत्रातही याचा विचार व्हायला हवा. सोबतच प्रत्येक नागरिकाने स्वतःचे वर्तमान सुरक्षित करण्यासाठी कट्टरपंथीयांसोबत चे सर्व आर्थिक व्यवहार बंद करणेच देशाच्याही सुरक्षेसाठी महत्वाचे पाऊल ठरेल. आतंकवादाला धर्म नसतो असे म्हणून क्रूर आतंकवादी आक्रमणाची पाठराखण करणाऱ्यांना खरेतर पोटातील भुकेला धर्म नसतो हे सत्य अनुभवायची वेळ आता आली आहे.

■ सौ. स्वाती हरेर, मुंबई.

## युद्धजन्य परिस्थितीत राजकीय पक्षांची जबाबदारी

सध्या देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपण सर्व भारतीय नागरिकांनी एकजूट दाखवण्याची गरज आहे. अशा संवेदनशील वेळी राजकीय पक्षांनी विशेषतः जबाबदारीने आणि संयमाने वागणं अपेक्षित आहे.

लोकशाहीमध्ये विरोधी मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे, पण जेव्हा देशाच्या सुरक्षेचा आणि जवानांच्या जीवनाचा प्रश्न उद्भवतो, तेव्हा पक्षभेद विसरून राष्ट्रहितासाठी एकसंघ भूमिका घेणं अत्यावश्यक ठरतं. माध्यमांमध्ये राजकीय पक्षांच्या काही निष्काळजी व उत्तेजक विधानांमुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होतो व शत्रू राष्ट्रांना चुकीचा संदेश जातो.

राजकीय नेत्यांनी आपल्या वक्तव्यांमध्ये संयम बाळगावा, सोशल मीडियावर कोणतीही अपुरी किंवा अपप्रचार करणारी माहिती शेअर करू नये, आणि जनतेमध्ये विश्वास व शांती राखण्यासाठी प्रयत्न करावेत. या काळात पक्षीय राजकारण न करता, सरकारच्या आणि लष्कराच्या निर्णयांना पाठिंबा देणं ही खरी देशभक्ती ठरेल.

म्हणूनच विनंती आहे की सर्व राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी युद्धजन्य परिस्थितीत फक्त राजकीय नफा-तोटा न पाहता, देशाच्या एकात्मतेसाठी जबाबदारीने वागावं हेच सनातन परंपरा शिकवते.

■ हृषीकेश हरदास, वर्धा.

## भगवान नृसिंह अवतार म्हणजे अधर्मावर धर्माचा विजय!

भगवान विष्णूचा प्रत्येक अवतार हा दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठीच असतो. ११ मे रोजी भगवान विष्णूच्या चौथ्या अवताराची नृसिंह जयंती आहे. हिरण्यकश्यपूला वाटायचं,' मीच ईश्वर आहे ,सर्वांनी माझंच नाव घ्यावं ',पण त्याचाच मुलगा भक्त प्रल्हाद हा विष्णुभक्त होता. जळी, स्थळी,काष्ठि, पाषाणी ईश्वर आहे. अशी त्याची श्रद्धा होती. पण हिरण्यकश्यपूला ते मान्य नव्हते. त्याच्यातला अहंकार, राक्षसी प्रवृत्ती इतकी वाढली होती की, त्याने स्वतःच्याच मुलाचा छळ केला. त्यासाठी भगवंताला नृसिंह अवतार घेऊन त्याचा नाश करावा लागला. जेव्हा जेव्हा अधर्म वाढतो ,तेव्हा तेव्हा धर्माच्या स्थापनेसाठी आणि सज्जनांच्या रक्षणासाठी प्रत्येक युगात ईश्वर अवतार घेतो असे श्रीकृष्ण वचन आहे .आज सर्वत्र अनाचार, अत्याचार, अधर्म वाढलेला दिसतो आहे ,दुष्ट प्रवृत्तींची आक्रमणे वाढलेली आहेत. पहलगाम हे त्याचे उदाहरण आहे. यासाठी, 'हे ईश्वरा खरंच अवतार घे !आणि तुज्या वाचनाप्रमाणे धर्माची संस्थापना आणि सज्जनांचे रक्षण कर आणि नांदू दे शांती या भारत वर्षात'.

■ सौ. रमा देशमुख

## ॲव्होकॅडो व्यतिरिक्त अन्य सुपरफूड्स



आजच्या धावपळीच्या जीवनात स्वतःसाठी वेळ काढणे खूप कठीण झाले आहे. याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी अनेक प्रकारचे फळं आणि भाज्या खात असतो. आजकाल ॲव्होकॅडोपासून बनवलेल्या गोष्टी खाण्याचा ट्रेंड खूप वाढला आहे. पण सर्वांनाच ॲव्होकॅडो आवडत नाही आणि ते महाग देखील असते. अहव्होकॅडो व्यतिरिक्त तुम्ही आहारात इतर फळांचा देखील समावेश करू शकता.

ॲव्होकॅडो हे असे एक फळ आहे ज्यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी, ई, बी6 आणि अँटीऑक्सिडंट्स तुमच्या त्वचेसाठी आणि केसांसाठी फायदेशीर ठरते. तुम्ही अहॅव्होकॅडो हे फळ टोस्टवर ठेवून किंवा त्यांचे सँडविच बनवून खाऊ शकता. जरी अहव्होकॅडो हे पोषक तत्वांचे भांडार असले तरी, काही पदार्थांमध्ये त्यापेक्षा जास्त पोषक तत्वे असतात.

जर तुम्हाला अहॅव्होकॅडो आवडत नसेल, तर काही सुपरफूड्स खावू शकता, जे ॲव्होकॅडोपेक्षा आरोग्यासाठी अधिक पौष्टिक आणि फायदेशीर असू शकतात.

### लिंबूवर्गीय फळे कोलेजन वाढवतील

१०० ग्रॅम ॲव्होकॅडोमध्ये फक्त १० मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते, तर लिंबू, संत्री,मोसंबी, द्राक्षे आणि किवी यांसारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये ५३ ग्रॅम व्हिटॅमिन सी असते. लिंबूचे पौष्टिक मूल्य ॲव्होकॅडोपेक्षा जास्त आहे. म्हणून, आहारात लिंबाचा अनेक प्रकारे समावेश करू शकता. हे त्वचेसाठी देखील फायदेशीर आहेत आणि कोलेजन वाढवण्यास देखील मदत करतात.

### हिरव्या पालेभाज्या

१०० ग्रॅम ॲव्होकॅडोमध्ये १६० कॅलरीज असतात. तर हिरव्या पालेभाज्या पालकामध्ये २३ कॅलरीज असतात. ज्यामुळे वजन वाढण्याची समस्या कमी होते. पालक हा ॲव्होकॅडोपेक्षा स्वस्त आहे, म्हणून आहारात पालकाचा समावेश केला पाहिजे.

### दुग्धजन्य पदार्थ

१०० ग्रॅम ॲव्होकॅडोमध्ये सोडियमचे प्रमाण फक्त ७ ग्रॅम असते, तर दूध, दही, चीज यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांमध्ये ४४ ग्रॅम सोडियम असते जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते.

### टोमॅटो कोलेजन वाढवण्यासाठी प्रभावी

१०० ग्रॅम टोमॅटोमध्ये १८ कॅलरीज असतात, जे कोलेजन वाढवण्यास मदत करते,

### चिया बियाणे

१०० ग्रॅम अळशीच्या बियांमध्ये १८ ग्रॅम प्रथिने असतात. आहारात अळशीच्या बियांचा अनेक प्रकारे समावेश करू शकता.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा मेहकर
(९४२१३९४३३९)

### आता नाही थांबायचं!

मनात येईल तेंव्हा
नक्षली घुसती सरहद्दीत
जीव घेतलाय यांनी
जवानांचे अगणित

संयमी शासन आमचे
निषेध खलीता पाठवतयं
शहीद म्हणुन जनतेच्या
भावनेला खत पाणी घालतय..

बंदुकीची देतात सलामी
विर पत्नीला रोख निधी
रक्त यांचं खवळत नाही
बदला हे घेणार कधी ?..

BEEM



https://ganeshvidya.antaryogfoundation.in



(CRT)

(VPP)



## आज का अंदाज

शुक्रवार ९ मे २०२५


पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ९ | २ | ५ | ६ | ९ |
| २९० | २३९ | १४० | १८० | ११० | २३० | १५० | १४४ |
| ३८० | ३४७ | ३४८ | ३६० | २०० | ३३९ | ३३० | २३४ |
| ४७० | ४०० | ६९० | ४५० | ४८० | ५०० | २४० | २७० |
| १२ | ४१ | ५१ | ९१ | २१ | ५१ | ६२ | ९२ |
| १३ | ४२ | ५२ | ९३ | २४ | ५२ | ६३ | ९३ |
| १८ | ४८ | ५७ | ९७ | २७ | ५७ | ६८ | ९७ |

**९ मे : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ५१ | ६२ |
| २५ | ३५ | ५६ | ६४ |
| २७ | ३७ | ५८ | ६७ |

## शब्दकोडे क्रमांक २१०६



**आडवे शब्द:–**
१) स्वातंत्र्यवीरांचे संपूर्ण नाव
११) कागदी चलन
१२) झाडाभोवतीचा कट्टा
१३) रममाण, निमग्न
१४) शिखराच्या छताचा मध्यभाग
१६) वाकलेला
१९) वारा
२०) हिंदीत सर्व
२१) दुसरे लग्न करणारी स्त्री
२२) दहावी रास
२४) पगारपत्रक
२७) नगरवासी
२८) सांभाळणारा, एक पालेभाजी
२९) पत्र
३२) विशेष
३३) एक चर्मवाद्य
३५) वयाने जास्त असलेला
३७) कलावंत
३९) दुधाच्या वड्या
४१) कडक
४२) नूतन
४३) मालाचा पुरवठा
४४) कल्लोळ, गोंधळ
४६) एखाद्या कामात सतत अडथळा येणे या अर्थाची म्हण
५०) रेशमी धोतर
५१) शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री मनोहर **
५२) पाताळ
५५) घागरा
५८) वार्ताहर
६१) बूड
६३) बाज विणण्याची सुती पट्टी
६५) मला
६६) वरच्या टरफलासह तांदूळ
६७) गोव्याची राजधानी
६८) आश्चर्याची गोष्ट, आश्चर्य
६९) काम, नशीब
७०) चाफा

**उभे शब्द:–**
१) भूदान यज्ञाचे प्रणेते
२) रंगमंचावर सादर होणारे नाट्य
३) खबदाडी
४) दरवाजा
५) उग्र वास
६) शेणामातीने जमीन गुळगुळीत करणे
७) देश, जमीन
८) कमळाचे तळे
९) दात
१०) जेमतेम
१५) फोडातील द्रव
१७) वणवा
१८) त्रासाची भुणभुण, बडबड
१९) परीक्षा देण्याची जागा
२१) भांडे
२२) सुसर
२३) जिनसांची यादी
२५) तपासणी करणारा
२६) धर
३०) अग्नी
३१) संगीतातील एक राग
३२) पणजोबांचे वडील
३४) मोटरसायकल
३६) रमापती
३७) श्रम मेहनत
३८) कर्णेंद्रिय
४०) सुळे, मोठे दात
४४) येणारा जाणारा, पै पाहुणा
४५) बोबडी वळाल्यानंतरची भाषा
४७) कदर करणारा
४८) लोचट, कोडगा , अतिशय बोलणारा
४९) पायजमा
५२) सांडलेले भाताचे कण
५४) उंट हाकणारा
५६) रत्न
५७) वेदनेची उसळी, खटका
५९) ठाणवई
६०) तास
६२) बांबू
६४) आवाज, ध्वनी
६६) सर्प

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नालेसफाईच्या खर्चात बचत करण्यात महापालिका सपशेल अपयशी

## नवीन नाले खोदाईमुळे खर्च वाढल्याचा महापालिकेचा दावा

**वसई, दि. ८, प्रतिनिधी**

खर्चात बचत करण्याच्या अनुषंगाने वसई-विरार महापालिकेने नालेसफाईचे काम वाहन विभागामार्फत करण्याचा निर्णय मागील वर्षी घेतला होता. त्यासाठी महापालिकेने वार्षिक ठेकेदाराकडून भाडेतत्त्वावर वाहने घेतलेली होती. जितके काम तितकाच खर्च त्यासाठी करण्यात येणार होता. हे काम ठराविक मुदतीत करण्याचे निर्बंध असल्याने खर्चात बचत होणार असल्याचा दावा महापालिकेने केला होता. प्रत्यक्षात मात्र; मागील वर्षी नालेसफाईचा खर्च साडेचार कोटी रुपयांनी वाढलेला होता. या वाढत्या खर्चाचा अंदाज घेऊन महापालिकेने नाले सफाईकरताच्या यंत्रसामग्रीसाठी यंदा 15 कोटींऐवजी 19 कोटी 38 लाख 419 रुपयांच्या खर्चास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'ए' ते 'आय'मध्ये पावसाळ्यात अनेक सखल भागात पाणी साचत असल्याने शहरातील पावसाळी कच्चे व पक्के नाल्यांतील गाळ काढून त्याची वाहतूक करणे इत्यादी कामांसाठी मे. बाबा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून बॅक-हो लोडर, पोकलेन, डंपर, जेसीबी इत्यादी वाहने भाडे तत्त्वावर घेण्यात येतात. त्यासाठी महापालिकेने ठराव क्रमांक 2029 दि. 3 फेब्रुवारी 2023 अन्वये 2023-24 या वित्तीय वर्षात नालेसफाईच्या कामासाठी 15 कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतलेली होती.



नालेसफाईच्या खर्चात बचत करण्याच्या अनुषंगाने महापालिकेने हे काम वाहन विभागामार्फत करण्याचा निर्णय घेऊन ठराविक मुदतीत काम करण्याचे निर्बंध घालण्यात आले होते. त्यासाठी घनकचरा व्यवस्थान विभागाच्या माध्यमातून या सर्व कामांवर निगरानी करण्यात येणार होती. मात्र खर्च बचत करण्यात महापालिका सपशेल अपयशी ठरली आहे. मागील वर्षी 21 एप्रिल 2023 रोजी बाबा कन्स्ट्रक्शन यांना यंत्र सामग्री पुरवण्याचे कार्यादेश देण्यात आलेले होते. त्यानुसार केलेल्या कामाबाबत मे. बाबा कन्स्ट्रक्शन यांनी प्रभाग समिती 'ए' ते 'आय'मधील नालेखोदाई करण्याकामी 19 कोटी 38 लाख 419 एवढी बिलाची रक्कम सादर केलेली होती.

तथापि; सन 2023-24 या वित्तीय वर्षात नालेसफाईकरता 15 कोटी तरतूद असल्यामुळे सदर नालेसफाई केल्याकामी 14 कोटी 94 लाख 77 हजार 293 रुपये मे. बाबा कन्स्ट्रक्शन यांना आधीच देण्यात आलेले होते. तर उर्वरित 4 कोटी 43 लाख 23 हजार 126 नंतर अदा करण्यात आलेली होती. त्याच अनुषंगाने महापालिकेने या वर्षीही नालेसफाईसाठीची तरतूद 19 कोटी 38 लाख 419 रुपये कायम ठेवलेली आहे. महापालिकेने शहरात नव्याने नालेखोदाई केलेली होती. त्यामुळे हा खर्च वाढला असल्याचे महापालिका सूत्रांचे म्हणणे आहे.

**शहरात 180 किलोमीटर लांबीचे दीडशेहून अधिक नाले**

वसई-विरार शहरात 180 किलोमीटर लांबीचे दीडशेहून अधिक नाले आहेत. त्यात प्रभाग समिती 'ए' ( 29) प्रभाग समिती 'बी' (12) प्रभाग समिती 'सी' (29) प्रभाग समिती 'डी' (8) प्रभाग समिती 'ई' (17) प्रभाग समिती 'एफ' (43) प्रभाग समिती 'जी' (51) प्रभाग समिती 'एच' (10) आणि प्रभाग समिती 'आय' (16) नाल्यांचा समावेश आहे. याशिवाय; पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूरस्थितीशी सामना करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजनांचा भाग म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाने नाले रुंदीकरण, कल्व्हर्ट बांधणी व रस्त्यांची उंची वाढवण्याची कोट्यवधी रुपयांची कामे हाती घेतली होती. त्यावर अंदाजित किंमत 30 कोटी इतका खर्च करण्यात आलेला होता. त्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत यंदा वसई-विरारकरांना पूरस्थितीचा सामना करावा लागणार नाही, असा विश्वास महापालिकेने व्यक्त केला होता. परंतु त्यानंतरही वसई-विरारकरांना पहिल्याच पावसात पूरस्थितीचा सामना करावा लागलेला होता.

**नालेसफाईच्या कामावर अधिकाऱ्यांची देखरेख**

नालेसफाईचे काम योग्यरीत्या व्हावे, यासाठी विशेष खबरदारी घेतली जात असल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. प्रत्येक कामाची जीओ टॅगिंग छायाचित्रे काढली जात आहेत. नालेसफाईच्या कामावर प्रत्येक प्रभागनिहाय उपअभियंता, सहाय्यक आयुक्त, उपायुक्त आणि अतिरिक्त आयुक्तांमार्फत पर्यवेक्षण केले जात आहे. प्रत्येक अधिकाऱ्याला ना देखरेखीसाठी नाले विभागून देण्यात आले आहेत. या नियोजनामुळे नालेसफाई योग्यरीत्या केली जाईल, असा विश्वास महापालिकेला आहे. त्यानुसार महापालिकेने 5 एप्रिलपासून नालेसफाईला सुरुवात केली असली तरी 9 व 10 एप्रिलपासून खऱ्या अर्थाने या कामाला सुरुवात झाली असल्याचे महापालिका सूत्रांचे म्हणणे आहे. मागील वर्षी 31 मे ही 'डेडलाइन' देण्यात आलेली होती. यंदा मात्र 7 जूनपर्यंत महापालिकेला नालेसफाई अपेक्षित आहे.

# नवघर खाडीवर पूल त्वरीत बांधा

## माजी महापौर नारायण मानकर यांची मागणी

**वसई, दि. ८, प्रतिनिधी**

वाढती वाहतूक लक्षात घेऊन नवघर (पूर्व) खाडीवर नवीन पूल बांधण्याचे काम त्वरीत सुरु करावे. जेणेकरून जुना पूल नादुरुस्त झाल्यावर नवा पूल बांधावा लागल्यास शहरवासियांची गैरसोय होणार नाही, अशी मागणी माजी महापौर नारायण मानकर यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

नवघर (पूर्व) खाडीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने ४० वर्षांपूर्वी पूल बांधला होता. त्यावरून नवघर पूर्व -पश्चिम वाहतूक चालू होती. वस्ती वाढल्याने मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने त्याच्या बाजूलाच नवीन पूल बांधला. या दोन्ही पुलावरून दुपदरी वाहतूक चालू होती. दरम्यानच्या काळात रेल्वेने ५ वी व ६ वी मार्गिका टाकण्याचे काम चालू केल्याने, जुना रेल्वे पूल तोडून नवीन पूल बांधण्याचे काम चालू केले आहे. त्यामुळे सध्या मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने बांधलेल्या पुलावरून वाहतूक चालू आहे. एकाच पुलावरून वाहतूक चालू असल्याने गर्दीच्या वेळी या पुलावरून वाहतूक कोंडी होते. त्यांचा त्रास कामगार, विद्यार्थी, रुग्ण व इतर सर्वसामान्य नागरिकांना होत आहे, याकडे मानकर यांनी महापालिकेचे लक्ष वेधले आहे.

सध्या नवघर (पूर्व) खाडीवर असलेला पूल जुना असून, त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट देखील झालेले नाही. तो नादुरुस्त झाल्यास त्याला बांधण्यासाठी किमान २ वर्षांहून अधिकचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे रेल्वे बांधत असलेल्या नव्या रेल्वे पुलाला जो कालावधी लागणार आहे, त्या कालावधीत हा खाडीपूल बांधल्यास नवीन पुलाला लागणार वेळ वाचेल व नागरिकांचीही सोय होईल, अशी सूचना मानकर यांनी केली आहे.

# विरार गार्डन-म्हाडा कॉलनी पुल वाहतूकीसाठी खुला

## विरार पश्चिमपट्टीतील ग्रामस्थांचा मार्ग सुकर

**वसई, दि. ८, प्रतिनिधी**



विरार गार्डन ते म्हाडा कॉलनी या परिसराला जोडणाऱ्या बोळींज नाल्यावरील पुलाचे उद्धाटन माजी आमदार क्षितिज ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या पुलामुळे पश्चिम पट्टीतील रहिवाशांचा मार्ग सुकर झाला असून अवघ्या 10 मिनिटांत विरार स्थानकात पोहचता येणार आहे.

विरार पश्चिमेतील उमराळा, करमाळा, बिरीम आळी, खवळे आळी, आदिवासी पाडा, नानभाट या गावांत जाण्यासाठी बोळींज-विरार हा एकमेव रस्ता आहे. परंतु, पावसाळ्यात अनेकदा हा रस्ता पाण्याखाली जात होता. त्यामुळे शाळा-कॉलेजांत जाणारी मुले, व्यावसायिक-नोकरदार यांचे नुकसान होत होते. त्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. शिवाय; म्हाडा कॉलनी आणि परिसरातील रहिवाशांनाही रेशनवरील धान्य व बोळींज नागरी आरोग्य केंद्रांत उपचारांसाठी यायचे झाल्यास संपूर्ण वळसा घालून यावे लागत होते.

ही अडचण लक्षात घेऊन या रस्त्याला पर्यायी मार्ग असावा, अशी मागणी या गावांतील नागरिकांनी माजी सभापती सखाराम महाडिक यांच्याकडे केली होती. या मागणी अनुषंगाने ग्रामस्थांसह विरार गार्डन मार्गासाठी त्यांनी मोर्चा काढलेला होता. त्यावेळी महापालिकेने एक मार्गी रस्ता बनवण्यास मंजुरी दिली होती. मात्र या मार्गाने समस्या सुटली नसल्याने विरार गार्डन-म्हाडा कॉलनी या भागाला सांधणारा पूल याठिकाणी बनवण्यात यावा, अशी मागणी पुढे आली होती.

माजी आमदार हितेंद्र ठाकूर व तत्कालिन आमदार क्षितिज ठाकूर यांच्या मार्गदर्शनात माजी स्थायी समिती सभापती अजीव पाटील यांनी 2019 साली हा प्रस्ताव स्थायी समितीच्या पटलावर ठेवला होता. दरम्यानच्या काळात भाजप, प्रहार व आगरी सेनेच्या कार्यकर्त्यांनी या पुलाचा उपयोग ग्रामस्थांऐवजी बांधकाम व्यावसायिकांना होईल, असा आरोप केल्याने महापालिकेने या कामाला स्थगिती दिली होती. परिणामी पुलाचे काम रखडले होते.

त्यानंतर तत्कालिन आमदार क्षितिज ठाकूर यांनी पुढाकार घेऊन आयुक्त अनिलकुमार पवार यांची भेट घेतली व या कामाची गरज आणि त्याची उपयोगिता त्यांना समजावून सांगितली. त्यामुळे आयुक्तांनी 2024 मध्ये हा पूल बांधण्याचा निर्णय घेऊन तात्काळ त्याबाबतचे कार्यादेश दिले. आजअखेर या पुलाचे काम पूर्ण झालेले आहे. या पुलामुळे विरार गार्डन येथील दिव्यांग शाळेत येणारे विद्यार्थी, म्हाडा कॉलनी परिसरातून बोळींज आरोग्य केंद्रात येणार रुग्ण तसेच उमराळा, करमाळा, बिरीम आळी, खवळे आळी, आदिवासी पाडा, नानभाट गावांतील रहिवाशांना थेट विरार स्थानकाकडे जाता येणार आहे, अशी माहिती माजी सभापती सखाराम महाडिक यांनी दिली.

याच नाल्यावर येत्या काळात पुरापाडा, रानपाडा, विनय युनिक या ठिकाणी आणखी काही पूल बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे संपूर्ण पश्चिम पट्टा विरार स्थानक परिसराशी जोडला जाणार आहे. या विकासकामांमुळे पावसाळ्यातील अडचणी-समस्या दूर होणार असल्याचेही सखाराम महाडिक यांनी सांगितले. या उद्धाटन कार्यक्रमाला बहुजन विकास आघाडीचे संघटक सचिव अजीव पाटील, माजी सभापती सखाराम महाडिक, माजी नगरसेवक अजित नाईक व बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कातकरी समाज देशाची ओळख ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी

**वसई, दि. ८, प्रतिनिधी**

कातकरी समाज ही देशाची ओळख आहे. शोषण अजूनही कायम आहे, त्यामुळे अशा साहित्य मेळयाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी यांनी उसगाव येथे पार पडलेल्या दोन दिवसीय श्रमजीवी साहित्य मेळयाच्या उद्धाटनप्रसंगी केले. साहित्य मेळयाचे स्वागताध्यक्ष रामभाऊ वारणा, तर संमेलनाध्यक्ष कविवर्य अशोक नायगावकर होते.

डॉ. महेश केळुस्कर यांनी साहित्याच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची गरज अधोरेखित केली. प्रास्ताविक ॲड. स्नेहा दुबे पंडित यांनी केले. अशोक नायगावकर यांनी आपल्या कवितांनी आणि प्रेरक भाषणाने श्रमिकांच्या साहित्यिक योगदानाला उजागर केले. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ नाटककार अशोक समेळ, गझलनवाज भीमराव पांचाळे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. महेश केळुस्कर, ज्येष्ठ प्रकाशक अशोक मुळे, शिल्पा शिवलकर, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार राजेंद्र गावीत, हरिश्चंद्र भोये, राजन नाईक, विलास तरे, प्रांताधिकारी शेखर घाडगे, विवेक पंडित, विद्युल्लता पंडीत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यावेळी उपस्थित होते.

मेळयातील कविसंमेलनाने सर्वांचे मन जिंकले. सुषमा राऊत आणि स्वाती जोशी यांनी सूत्रसंचालन केले. अशोक नायगावकर, डॉ. महेश केळुस्कर, महेश लीला पंडित, ज्योती बालिगा राव, डी.एन. गांगण, रेषा अकोटकर, इग्निएस डायस, अमोल नाईक, फेलिक्स डिसोजा, मायकल लोपीस, संगीता अरबुने, प्रकाश पाटील, पल्लवी परुळेकर बनसोडे, पिराजी जाधव, मंजुषा गवई, विशाखा गाळवणकर, प्रवीण पाटील, प्रशांत पाटील, शिल्पा परुळेकर पै, प्रा. शुभम पाटील, विजय पुरव, स्नेहा संदीप पंडित, मधुकर तराळे, विक्रांत केसरकर, मिलिंदराज पंडित, तुकाराम धांडे, योगेश गोतारणे, सुनील लोणे, प्रमोद पवार आणि सुहास मुकणे,अशोक समेळ आणि गणेश चंदनशिवे यांच्या कवितांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. ॲड. पूजा माळी यांनी आभार मानले.

मेळयात विवेक पंडित यांच्या 'मुके ते जन्मले होते' या पुस्तकाचे डिंपल पब्लिकेशनतर्फे प्रकाशन झाले. पहिल्या दिवसाचा समारोप आदिवासी बांधवांच्या गौरी गीत, तारफा नृत्य आणि गौरी नाचाने झाला. विवेक पंडित, अशोक समेळ आणि अशोक मुळे,गणेश चंदनशिवे यांनी नृत्यात सहभाग घेतला.

दुसऱ्या दिवशी प्रेमानंद गज्वी यांच्या प्रकट मुलाखतीने उपस्थितांवर प्रभाव टाकला. 'जय श्रमदेवी कृपकरी' सत्रात सुनीता हिवरे (पोलिस हवालदार), वैजयंती खंबळ (सहाय्यक पोलीस निरीक्षक), मीना मदन सुतार (परिचारिका), आणि हर्षला पाटील (एस.टी. बसवाहक) यांचा सन्मान झाला. अश्विनी भोईर आणि मकरंद सावे यांनी सूत्रसंचालन केले. या महिलांनी आपल्या संघर्षमय कहाण्या सांगितल्या. 'आजची पत्रकारिता आणि श्रमिकांच्या व्यथा' या परिसंवादात कमलेश सुतार, सारंग दर्शने, उदय तानपाठक आणि प्रा. अविनाश कोल्हे यांनी भाग घेतला. कुणाल रेगे यांनी संचालन केले. पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपावर आणि श्रमिकांच्या समस्यांवर सखोल चर्चा झाली. मेळयाच्या समारोपाला अतिरिक्त पोलीस आयुक्त दत्ता शिंदे, दत्ता मणेरीकर, पोलीस निरीक्षक संजय हजारे, संदीपान सोनवणे, ॲड. पवनी यादव, प्रेमानंद गज्वी, अशोक समेळ, डॉ. महेश केळुस्कर, अशोक मुळे, आणि संजीवनी समेळ उपस्थित होते.

# "सीडबॉल मॅन" दीपक देसले यांचा हरित क्रांतीचा निर्धार

## 5 लाख सीड बॉल निर्मितीचा संकल्प

**पालघर, दि. ८, प्रतिनिधी**

'पर्यावरण वाचवा, वसुंधरा सजवा' या उपक्रमांतर्गत पालघर जिल्ह्यात एक आगळी वेगळी हिरवी क्रांती सुरू झाली आहे. या दिवसाचे औचित्य साधून जिल्ह्यातील विविध स्पर्धांतील विजेत्यांचा सन्मान महाराष्ट्र राज्याचे वनेमंत्री व पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या शुभहस्ते,खासदार डॉ.हेमंत सवरा, जिल्हाधिकारी डॉ इंदूराणी जाखर, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, तसेच इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. विजेत्यांना प्रशस्तीपत्रासह 'सीड बॉलचा डबा' देऊन गौरवण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी सोनाली मातेकर,संगीता भागवत तसेच इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.



या उपक्रमामध्ये चर्चेत येणारे नाव म्हणजे 'सीडबॉल मॅन' दीपक देसले यांचे. जिल्हा परिषद शाळा, लिलकपाडा, कोसबाड (ता. डहाणू) येथे कार्यरत असलेले हे पर्यावरणप्रेमी शिक्षक मागील चार वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या आणि गावकऱ्यांच्या सहकार्याने बीज गोळ्यांची क्रांती घडवत आहेत. यंदा त्यांनी तब्बल ५ लाख सीड बॉल निर्मितीचा संकल्प केला आहे.

त्यांच्या पुढाकाराने सीड बॉल महोत्सव ४.० अंतर्गत यंदा राज्यभरातील १३ जिल्ह्यांत – लातूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, रायगड, नवी मुंबई, अमरावती, अकोला, नांदेड, कोपरगाव आदी ठिकाणी बियांची पाठवणी करण्यात आली आहे. या बिया विद्यार्थ्यांच्या हातून शेकडो शाळांमध्ये सीड बॉलमध्ये रूपांतरित होणार आहेत. या उपक्रमाची सुरुवात टोकेपाडा, घोलवड येथे झाली होती. पहिल्या वर्षी १० हजार , दुसऱ्या वर्षी २३ हजार, तर तिसऱ्या वर्षी डहाणू, तलासरी, पालघर तालुक्यातील १७ पर्यावरणप्रेमी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली १ हजार ८०० विद्यार्थ्यांनी १ लाख १७ हजार सीड बॉल तयार केले होते.

# महावितरणच्या संचालक (प्रकल्प) पदी सचिन तालेवार रूजू

**मुंबई, दि. ८, प्रतिनिधी**

महावितरण कंपनीचे संचालक (प्रकल्प) म्हणून श्री. सचिन तालेवार यांनी बुधवारी (दि. ७) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते इंदूर येथील मध्यप्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून कार्यरत होते. श्री. तालेवार गेल्या २८ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.

नवनियुक्त संचालक (प्रकल्प) श्री. सचिन तालेवार मूळचे नागपूर जिल्ह्याचे असून त्यांचे शालेय शिक्षण छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथे झाले आहे. विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केल्यानंतर श्री. तालेवार १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून चंद्रपूर येथे रूजू झाले. पदोन्नतीने सहायक अभियंता म्हणून कार्यरत असताना सन २००६ मध्ये सरळ सेवा भरतीद्वारे त्यांची कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. या पदावर त्यांनी वर्धा, नागपूर व जालना येथे काम केले आहे. दरम्यान महावितरणकडून त्यांची गुडगाव येथील मॅनेजमेंट डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूटमधील (एमडीआय) एनर्जी मॅनेजमेंटच्या पोस्ट ग्रॅज्यूएशन डिप्लोमा इन बिझीनेस मॅनेजमेंट (पीजीडीएम) अभ्यासक्रमासाठी निवड झाली होती. सन २००७-०८ मध्ये हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.



त्यानंतर सन २०१६ मध्ये झालेल्या सरळसेवा भरतीमध्ये श्री. सचिन तालेवार यांची अधीक्षक अभियंता म्हणून निवड झाली. या पदावर लातूर येथे काम केले. तर सन २०१८ मध्ये सरळसेवा भरतीद्वारे त्यांची मुख्य अभियंता म्हणून निवड झाली. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून त्यांनी जून २०१८ ते डिसेंबर २०२२ पर्यंत काम केले. बदलीद्वारे छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत असताना मे २०२३ मध्ये श्री. तालेवार यांची इंदूर येथील मध्यप्रदेश पश्चिम क्षेत्र विद्युत वितरण कंपनीचे संचालक (तांत्रिक) म्हणून निवड झाली. या कंपनीत ते दोन वर्षांपासून कार्यरत होते. त्यानंतर महावितरणचे संचालक (प्रकल्प) म्हणून नुकत्याच झालेल्या थेट भरती प्रक्रियेत त्यांची निवड झाली आहे.

'महावितरणच्या ग्राहकांना आणखी दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी सुधारित वितरण क्षेत्र योजनेसह (आरडीएसएस) विविध योजनांमधून पायाभूत वीजयंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांसोबतच प्रामुख्याने सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सर्व योजनांना आणखी गती देत कामे लवकर पूर्ण करण्यात येईल', असे महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. सचिन तालेवार यांनी सांगितले.


# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स: ०२५० २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./भांडार/४३१/२५
दिनांक : ०८/०५/२०२५

## जाहीर ई-निविदा सूचना (भांडार)

वसई विरार शहर महानगरपालिका खालील नमूद कामासाठी व्हिडीओग्राफी व फोटोग्राफी इतर व्यवस्था भाडयाने करणारे पुरवठादार, इच्छुक व्यक्ती यांच्याकडून दि. २३/०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत ई-निविदा मागविण्यांत येत आहेत. यासंबधीचे कोरे ई-निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २३/०५/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.

| अ.क्र. | कामाचा तपशील | ई-निविदा फॉर्मची किंमत | ई-निविदा इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सन २०२५/२६ ते सन २०२६/२७ या वित्तीय वर्षाकरिता व्हिडीओग्राफी व फोटोग्राफी व इतर व्यवस्था भाडयाने पुरवठा करणे. | रु. १८,०००/- + १८% जी.एस.टी. एकुण रु. २१,२४०/- | रु. १,८०,०००/- |

**अटी-शर्ती**

१) ई-निविदा फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची (प्रिपरेशन व सबमिशनची) अंतिम दिनांक २३/०५/२०२५ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत राहिल.

२) ठेकेदारांनी ई-निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन त्यापैकी अ.क्रं. १ चे लिफाफ्यात तांत्रिक बाबींची व अ.क्रं. २ चे लिफाफ्यात वित्तीय बाबींची कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावीत.

३) निविदाकारांनी ई-निविदा फॉर्म फी इसारा रक्कम ऑनलाईन पेमेंट गेटवे व्दारे भरावयाची आहे. वरील सर्व शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकिंग, RTGS, NEFT मार्फत भरणा करता येतील. निविदा फॉर्म फी शुल्क व इसारा रक्कम रोखीने, धनादेश किंवा धनाकर्षाव्दारे वसई-विरार शहर महानगरपालिकेत स्विकारली जाणार नाही.

४) सदर कामासंदर्भात इच्छुक ई-निविदाकार यांचे समवेत दि. १५/०५/२०२५ रोजी निविदा पूर्व बैठक महापालिका मुख्य कार्यालय, मा. अतिरिक्त आयुक्त यांचे दालनात दु. १२.०० वाजता ठेवण्यात आलेली आहे.

५) मुदतीत प्राप्त झालेल्या ई-निविदा वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय मा. उप आयुक्त (भांडार) यांचे दालनात दिनांक २६/०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता अथवा इतर सोयीचे दिवशी उपस्थित ई-निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

६) ई-निविदा प्रक्रियेचा तपशिल वरील संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध होईल.

७) ई-निविदा प्रणाली बाबत काही शंका असल्यास त्याचे निरसन ०१२०-४२००४६२ या हेल्पलाईन वरुन करुन घ्यावे

८) इतर सविस्तर अटी-शर्ती ई-निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत.

सही/-
उप आयुक्त (भांडार)
वसई विरार शहर महानगरपालिका

जावक क्र.व.वि.श.म./मा.व.ज./१९२/२०२५
दिनांक: ०८/०५/२०२५

# घरीच बनवा स्वादिष्ट मिठाई




# अस्मिता

# स्वत:चा ब्रँड तयार करा



# यशस्विनी ऋतुजा



# गुंता नक्की सुटेल



# प्रभावी पपई फेस पॅक



# लग्न उन्हाळ्यात आहे?



# अन्न विषबाधा टाळण्यासाठी...











# भारत-पाकिस्तान तणावामुळे बाजारात दबाव
## मिडकॅप-स्मॉलकॅप शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण



**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबवत भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केली आहेत. यानंतर बुधवारी रात्री पाकिस्तानने भारतातील १४ शहरांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. सध्या दोन्ही देशात तणावग्रस्त परिस्थिती आहे. याचा परिणाम दोन्ही देशांच्या शेअर बाजारावरही पाहायला मिळाला. कराची बाजार तब्बल ७ टक्क्यांनी कोसळला. आपल्याकडे तशी परिस्थिती झाली नसली तरी सेन्सेक्स आणि निफ्टी सुमारे १% ने घसरले. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांमध्ये सर्वाधिक घसरण झाली. क्षेत्रीय आघाडीवर बोलायचं झालं तर रिअल्टी, मेटल, पीएसई आणि ऑटो निर्देशांक घसरणीसह बंद झाले. ऊर्जा, तेल-वायू आणि औषध कंपन्यांचे शेअर्सही दबावाखाली राहिले. फक्त डिफेन्स स्टॉक्समध्ये वाढ नोंदवली गेली.

निफ्टी १४१ अंकांनी घसरून २४,२७४ वर बंद झाला. तर सेन्सेक्स ४१२ अंकांनी घसरून ८०,३३५ वर बंद झाला. निफ्टी बँक २४५ अंकांनी घसरून ५४,३६६ वर बंद झाला. मिडकॅप १,०५८ अंकांनी घसरून ५३,२२९ वर बंद झाला.

**सेन्सेक्स 80,335**

**निफ्टी 24,274**

**कोणत्या स्टॉकमध्ये चढउतार?**

दोन देशांच्या तणावादम्यान बाजार दिवसाच्या नीचांकी पातळीवर बंद झाला. व्यापक बाजारात मोठी घसरण दिसून आली. रुपयातही मोठी घसरण झाली असून तो दिवसाच्या नीचांकी पातळीवर जवळजवळ १.५% घसरून बंद झाला. रुपयाची गेल्या २ वर्षातील सर्वात मोठी एका दिवसाची घसरण आहे. शेवटच्या तासात, ३ शेअर्समध्ये घसरण झाली तर १ शेअर वाढला. निफ्टीचे ४५ शेअर्स लाल रंगात बंद झाले. या शेअर्समध्ये ४% पर्यंत घसरण झाली. बहुतेक मिडकॅप समभागांमध्ये मोठी घसरण झाली, १०० पैकी ९४ मिडकॅप निर्देशांक समभागांमध्ये घसरण झाली.

कॅनरा बँकेच्या कमाईच्या अहवालानंतर, शेअरमध्ये २% पेक्षा जास्त वाढ दिसून आली. भारत फोर्ज, एस्कॉर्ट्स कुबोटा आणि एशियन पेंट्स यांचे चौथ्या तिमाहीच्या निकालांनंतर घसरण झाली. सिम्फनी आणि निवा बुपा यांनी चांगले निकाल नोंदवले, त्यांच्या समभागात ७-८% वाढ झाली. चीनने सायपरमेथ्रिन आयातीवर अँटी-डंपिंग शुल्क लादल्यानंतर यूपीएलमध्ये ५% घट झाली. चौथ्या तिमाहीतील उत्पन्न अंदाजापेक्षा कमी आल्यानंतर व्होल्टास आणि ब्लू स्टारच्या शेअर्समध्ये २-५% घट झाली आहे.

# 'ऑपरेशन सिंदूर' ट्रेडमार्कसाठी स्पर्धा! 'रिलायन्स'सह चौघे शर्यतीत

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**

पहलगाममधील हल्ल्याचा बदला म्हणून भारतीय सैन्याने मंगळवारी मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. भारतीय सैन्याने या अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये अकस्मात क्षेपणास्त्र हल्ले करून दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त केले. सध्या जगभरात 'ऑपरेशन सिंदूर' चर्चेचा विषय ठरले आहे. दरम्यान, मुकेश अंबानी अध्यक्ष असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीजने बुधवारी (७ मे) ट्रेड मार्क्स रजिस्ट्रीकडे 'ऑपरेशन सिंदूर'ची नोंदणी वर्क मार्क म्हणून करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

शिक्षण आणि मनोरंजन सेवांचा समावेश असलेल्या वर्ग ४१ अंतर्गत 'वस्तू आणि सेवा'साठी या शब्दाची नोंदणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, मुकेश अंबानी यांच्यासह मुकेश चेतराम अग्रवाल, ग्रुप कॅप्टन कमल सिंग ओबेरह (निवृत्त) आणि दिल्लीतील वकील आलोक कोठारी यांनीही या शब्दाच्या ट्रेडमार्क नोंदणीसाठी अर्ज केले आहेत.

वाणिज्य मंत्रालयाच्या ट्रेडमार्क सर्च पोर्टलवरील माहितीनुसार, रिलायन्सने ७ मे रोजी वर्ग ४१ अंतर्गत ट्रेडमार्क म्हणून या शब्दाच्या नोंदणीसाठी अर्ज केला. चारही अर्जदारांनी नाइस क्लासिफिकेशन वर्ग ४१ अंतर्गत नोंदणीसाठी अर्ज दाखल केला आहे. ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे.




- शिक्षण आणि प्रशिक्षण सेवा
- चित्रपट आणि मीडिया प्रोडक्शन
- लाइव्ह परफॉर्मन्सेस आणि इव्हेंट्स
- डिजिटल कंटेंट डिलिव्हरी आणि पब्लिशिंग
- सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रम

या श्रेणीचा वापर मुख्यतः ओटीटी प्लॅटफॉर्म्स, प्रोडक्शन हाऊसेस, ब्रॉडकास्टर आणि इव्हेंट कंपन्या करतात. ज्यावरून असे सूचित होते की 'ऑपरेशन सिंदूर' हे लवकरच एखाद्या चित्रपटाचे शीर्षक, वेब सिरीज अथवा डॉक्युमेंटरी ब्रँड बनू शकते.

**ट्रेडमार्क कायद्यात काय आहे तरतूद?**

दरम्यान, ट्रेडमार्क कायदा, १९९९ मधील तरतुदीनुसार, दिशाभूल करणारे, आक्षेपार्ह अथवा सार्वजनिक धोरणाच्या विरुद्ध असलेला ट्रेडमार्क नाकारण्याचा अधिकार रजिस्ट्रीला आहे. कलम ९ (२) आणि कलम ११ अंतर्गत, जर राष्ट्रीय संरक्षणाशी चुकीचा संबंध जोडला जात असल्याचे सूचित होत असेल अथवा त्यातून सार्वजनिक भावना दुखावल्या जात असतील तर रजिस्ट्राराकडून एखादा ट्रेडमार्क शब्द नाकारला जाऊ शकतो.

# पाकिस्तानच्या शेअर बाजाराला घरघर
## 7 टक्क्यांची घसरण झाल्यावर थांबवावी लागली ट्रेंडिंग

**कराची, दि. ८ वृत्तसंस्था**

भारताने बुधवारी पहाटेच्या सुमारास पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरवर एअर स्ट्राइक केल्यानंतर पाकिस्तानच्या कराची स्टॉक्ट एक्सचेंजचा प्रमुख निर्देशांक KSE-30 मध्ये मोठी घसरण झाली होती. त्यानंतर आज दुसऱ्या दिवशीही ही पडझड कायम असून आज निर्देशांकात ७.२ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली. बुधवारी निर्देशांक ३ टक्क्यांनी खाली आला होता. आज केएसई-३० मध्ये ६.३ टक्क्यांची घसरण झाल्यानंतर व्यवहारांवर निर्बंध घातले गेले. भारत आणि पाकिस्तानदरम्यान तणाव निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या शेअर बाजाराला त्याचा फटका बसला आहे.

आज सकाळी बाजार उघडताच केएसई निर्देशांकात वाढ झालेली दिसली होती. कालच्या घसरणीनंतर बाजाराने १,८५० अंकाची उसळी घेऊन १.७ टक्क्यांची वाढ अनुभवली होती. मात्र ही वाढ क्षणिक ठरली आणि दुपारपर्यंत निर्देशांक जवळपास ६,००० अंकानी कोसळला.

कराची आणि लाहोरसारख्या प्रमुख शहरांमध्ये भारताकडून ड्रोन पाडण्यात आल्याची बातमी पसरल्यानंतर गुंतवणूकदारांमध्ये घबराट पसरली. निर्देशांकात ६.३ टक्क्यांची घसरण होताच व्यवहार तात्काळ थांबविण्यात आले. ज्यामुळे पुढील मोठी घसरण आटोक्यात आणता आली. भारताच्या ड्रोन्सनी पाकिस्तानात हल्ला केल्याच्या बातम्या आल्यानंतर गुंतवणूकदारांनी विक्रीचा सपाटा लावला, अशी माहिती पाकिस्तानमधील बाजार तज्ज्ञांनी दिल्याचे वृत्त आहे.




भारताचे ड्रोन्सनी कराची आणि लाहोरमधील काही ठिकाणांना लक्ष्य केल्याची बातमी समोर आल्यानंतर एकच घबराट पसरली. ज्यामुळे विक्रीचा जोर वाढून निर्देशांक अतिशय कमी वेळेत ६ टक्क्यांनी घसरला.

भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या शेअर बाजारावर बराच दबाव आहे. बुधवारी सकाळी ३.१ टक्क्यांची घसरणीसह सुरू झालेला बाजार सायंकाळी बंद होताना ६ टक्क्यांच्या घसरणीसह बंद झाला होता. गेल्या काही काळातील पाकिस्तानी बाजाराची ही सर्वाधिक निराशाजनक कामगिरी होती.

# एअर स्ट्राइक दिवशी झाला जन्म कुटुंबीयांनी मुलीचे नाव 'सिंदूर' ठेवले

**कटिहार, दि. ८ वृत्तसंस्था**

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय



लष्कराने 'ऑपरेश सिंदूर' राबबवले. या अंतर्गत भारताने पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला. या हल्ल्यात अनेक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारताने बदला घेतला.

दरम्यान, बिहारच्या कटिहारमधून एक बातमी समोर आली आहे. भारताने घेतलेल्या बदल्याचे कौतुक करत, एका जोडप्याने त्यांच्या नवजात मुलीचे नाव 'सिंदूर' ठेवले. देशासोबतच नवजात बाळाचे कुटुंबही खूप आनंदी आहे.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. भारताने प्रत्युत्तर दिले. बुधवारी पहाटे, भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले, यात बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदचा बालेकिल्ला आणि मुरीदके येथील लष्कर-ए-तोयबाचा अड्डा यांचा समावेश आहे. या हल्ल्याचे सांकेतिक नाव 'ऑपरेशन सिंदूर' होते.

२२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पहलगामला भेट देण्यासाठी आलेल्या लोकांना लक्ष्य केले होते. त्यानंतर संपूर्ण देश संताप व्यक्त केला.

# 'ऑपरेशन सिंदूर' वर अजमेर शरीफ दर्ग्याने मांडली भूमिका
## केले भारतीय सैन्याचे अभिनंदन

**अजमेर, दि. ८ वृत्तसंस्था**

ऑपरेशन सिंदूर राबवून भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेत पाकिस्तानला धडा शिकवला आहे. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये एअर स्ट्राईक करुन भारताने दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. त्यानंतर देशभरातून या कारवाईचे कौतुक केले जात आहे. विरोधकांपासून ते सेलिब्रिटींपर्यंत आणि खेळाडूंपासून धर्मगुरुंपर्यंत सर्वच स्तरातातून सरकारचे आणि भारतीय सैन्यदलाचे अभिनंदन करण्यात येत आहे. अजमेर शरीफ दर्ग्याचे आणि चिश्ती फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी सय्यद सलमान चिश्ती यांनीही भारतीय सैन्याचे अभिनंदन केले.



भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केल्यानंतर पाकिस्तान बिथरला आहे. पाकिस्तानात घुसून भारताने दहशतवाद्यांच तळ उद्ध्वस्त केले. यामध्ये १०० पेक्षा जास्त दहशतवाद्यांचा खात्मा झाला आहे. या कारवाईनंतर अजमेर शरीफ दर्ग्याचे हाजी सय्यद सलमान चिश्ती यांनी दहशतवादाला आश्रय देणाऱ्या प्रत्येकाचा नाश केला जाईल असं म्हणत भारतीय सैन्याच्या कारवाईचे कौतुक केले.

या कारवाईन भारताकडून संपूर्ण जगाला एक स्पष्ट संदेश दिलाय की जो कोणी दहशतवादाला प्रोत्साहन देईल त्याला अशा प्रकारे नष्ट केले जाईल, असं हाजी सय्यद सलमान चिश्ती म्हणाले.

"सगळ्यात आधी मी आपल्या देशाच्या सशस्त्र दलांचे दहशतवादी तळ उद्ध्वस्त करून त्यांचा पूर्णपणे नायनाट केल्याबद्दल अभिनंदन करतो. २२ एप्रिल रोजी झालेल्या लज्जास्पद दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई आहे, ज्यामध्ये निष्पाप आणि निःशस्त्र भारतीयांना लक्ष्य करण्यात आले आणि त्यांचे प्राण गेले. आज, भारताने योग्य उत्तर दिले आहे. मी सर्वांचे अभिनंदन करतो. जो पण दहशतवादाला प्रोत्साहन आणि पाठिंबा देईल त्यांना अशाच प्रकारे जमिनीत गाडले जाईल. आम्ही १४० कोटी देशवासीय संपूर्ण जगाला सांगू इच्छितो की या जगात दहशतवादाला स्थान नाही, जो कोणी दहशतवादाला आश्रय देईल त्याला जमिनीत गाडले जाईल. कठोरपणे प्रत्युत्तर दिले जाईल," असे हाजी सय्यद सलमान चिश्ती यांनी म्हटले.

# 'मंगलाष्टका रिटर्न्स'मधून उलगडणार सुलट प्रेमाची उलट गोष्ट!




**सिनेरंग**

प्रेमकथा हा चित्रपटसृष्टीचा सर्वाधिक आवडता विषय... त्यामुळे अनेक प्रेमकहाण्या आजवर पडद्यावर आल्या आहेत. मात्र, सुलट प्रेमाची उलट गोष्ट ही अनोखी टॅगलाइन असलेला 'मंगलाष्टका रिटर्न्स' हा नवा चित्रपट २३ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याआधी घटस्फोट सोहळ्याचे एक अनोखे टीजर पोस्टरही सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत आले होते. दमदार स्टारकास्ट असलेल्या या चित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आलं आहे. शारदा फिल्म्स प्रोडक्शनच्या वीर कुमार शहा यांनी निर्मिती केलेल्या "मंगलाष्टका रिटर्न्स" या चित्रपटाचं दिग्दर्शन योगेश पांडुरंग भोसले यांनी केलं आहे. डॉ. भालचंद्र यांनी कथा आणि संवादलेखन, पी. शंकरम यांनी संगीत दिग्दर्शन, विकास सिंह यांनी छायांकन, एस. विक्रमन यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. चित्रपटात वृषभ शाह, शीतल अहिरराव ही नवी जोडी पाहायला मिळणार आहे. त्यांच्यासह प्रसाद ओक, आनंद इंगळे, सक्षम कुलकर्णी, सोनल पवार, कमलेश सावंत, सुनील गोडबोले, प्रसन्न केतकर, प्राजक्ता नवले, भक्ती चव्हाण, शीतल ओसवाल, श्वेता खरात, समीर पौलस्ते यांच्याही भूमिका आहेत. राजकीय विरोधाची पार्श्वभूमी असलेल्या दोन कुटुंबातील तरुण-तरुणी एकाच कॉलेजमध्ये एकत्र येतात. मात्र, त्यानंतर त्यांच्या आयुष्यात काय काय घडामोडी घडत जातात याची रंजक कहाणी "मंगलाष्टका रिटर्न्स" या चित्रपटात पहायला मिळणार आहे.चित्रपटाच्या पोस्टरचा लुकही अगदी फ्रेश आहे. त्यामुळे ही गोष्ट अनुभवण्यासाठी २३ मेपर्यंत प्रेक्षकांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट "चिडिया" प्रदर्शनासाठी सज्ज

आजवर आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविलेल्या आगामी "चिडिया" या हिंदी चित्रपटाचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे. की मीडिया वर्क्स, उदाहरणार्थ निर्मित या संस्थेअंतर्गत या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून स्मायली फिल्म्स यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. मेहरान अमरोही लिखित आणि दिग्दर्शित, 'चिडिया' ही एक आठवण आहे,

मुंबईतील चाळीच्या घरात राहणाऱ्या शानू आणि बुआ या दोन उत्साही भावांची हृदयस्पर्शी गोष्ट आहे. केवळ कल्पनाशक्ती, आशा, त्यांची आई आणि समाजातील लोकांच्या मदतीने ते त्यांच्या परिस्थितीपेक्षा खूप मोठ्या स्वप्नाचा पाठलाग कसा करतात? मुले त्यांची स्वप्ने जिवंत ठेवण्यासाठी ज्या अदृश्य लढाया लढतात त्याची एक रंजक गोष्ट या चित्रपटात दाखविण्यात आली आहे. जवळजवळ एक दशकापूर्वी पूर्ण झालेला, चिडियाने आधीच जागतिक स्तरावर लोकप्रियता मिळवली आहे, चेक रिपब्लिक (झ्लिन आयएफएफ),

**लोकरंजन**

द नेदरलँड्स (सिनीकिड), द यूएसए (एसएआयएफएफ), रशिया (स्पिरिट ऑफ फायर आयएफएफ), इराण (मुलांसाठी आणि प्रौढांसाठी आयएफएफ) आणि त्यापलीकडे असलेल्या महोत्सवांमध्ये मने जिंकली आहेत.




# 'व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगले' सोनी बीबीसी अर्थवर

सोनी बीबीसी अर्थ आपल्या 'व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगले'च्या नवीन सीझनसह प्रेरणादायक प्रवास करण्यासाठी प्रेक्षकांना आमंत्रित करत आहे. या सीझनच्या 12 वेधक एपिसोड्समध्ये बेन फोगले जगातील अत्यंत निर्जन ठिकाणी जातो आणि अशा ठिकाणी स्वखुशीने रहात असलेल्या काही विलक्षण लोकांच्या जीवनाची एक झलक प्रेक्षकांना देतो. 'व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगले' हा शो या वाहिनीवर सुरु झालेला आहे.

'व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगले' चा दहावा सीझन प्रेक्षकांना नक्कीच विलक्षण कहाण्यांमध्ये गुंतवून ठेवेल. या कहाण्यांमधून माणूस आणि निसर्गाच्या शक्तीमधील एक घट्ट नाते दिसून येते. या शो मध्ये बेन फोगल काही काळजीपूर्वक निवडलेल्या निर्जन स्थानांचा



प्रवास करतो, जेथे तो अशा लोकांसोबत राहतो, ज्यांनी जाणूनबुजून समाजापासून दूर राहणे पसंत केले आहे. बेन फोगल प्रेक्षकांना व्हिज्युअल मोहिमेवर आपल्यासोबत घेऊन जातो, ऑस्ट्रेलियातील सुदूर लँडस्केपचा शोध घेतो, कॅलिफोर्नियाच्या खडतर पर्वतीय प्रदेशात कोणत्याही सुविधांशिवाय राहणाऱ्या आणि एका तरंगत्या स्ट्रक्चरवर ओरेगोनियन आयुष्य जगणाऱ्या एका कुटुंबाशी आपली गाठ घालून देतो. या प्रवासात टस्कनी येथे राहणाऱ्या, पर्यावरणाशी निष्ठावान अशा एका ब्रिटिश जोडप्याशी आपला परिचय होतो, तसेच झांबिया येथे सफारी व्यवसाय चालवणाऱ्या एका कुटुंबाचे आकर्षक जीवन देखील आपल्याला जवळून बघता येते.

म्हणूनच बघायला विसरू नका, 'व्हेअर द वाइल्ड मेन आर विथ बेन फोगले'च्या दहाव्या सीझनचा प्रीमियर सोमवारी रात्री 9:00 वाजता फक्त सोनी बीबीसी अर्थवर!

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# "फोटो, व्हिडिओ असतील तर द्या", पहलगाम हल्ल्याच्या चौकशीसाठी एनआयएचे स्थानिकांना आवाहन, पर्यटकांकडूनही मागितली मदत

**नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ल्याचे व्हिडिओ आणि फोटो असल्यास तत्काळ संपर्क साधण्याचे आवाहन राष्ट्रीय तपास यंत्रणेने बुधवारी पर्यटक आणि स्थानिकांना केले. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्याचा तपास केला जात आहे. या हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाला होता.

पहलगाम हल्ल्यासंदर्भातील चौकशीसाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेने आतापर्यंत १०० स्थानिकांची चौकशी केली आहे. स्थानिकांकडून एनआयएने अनेक व्हिडिओ आणि फोटो जप्त केले आहेत. या व्हिडिओ आणि फोटोंची आता तपासणी केली जाणार आहे.

हल्लेखोर आणि त्यांच्या कार्यपद्धतीचे कोणतेही संभाव्य संकेत शोधण्यासाठी एनआयएकडून विविध व्हिडिओ आणि फोटोंची सखोल तपासणी करणार आहे. "पर्यटक आणि इतरांनी, जाणीवपूर्वक किंवा अनावधानाने काही संबंधित तपशील पाहिले, एकले किंवा क्लिक केले असतील जे एनआयएला काश्मीरमधील पर्यटकांवरील हल्ल्यामागील कट उलगडण्यास मदत करू शकतील, त्यांनी ते द्यावे", असे एनआयएच्या निवेदनात म्हटले आहे.

"मानवतेविरुद्धच्या या भयानक गुन्ह्याच्या तपासात कोणतीही उपयुक्त माहिती किंवा पुरावे गमावले जाऊ नयेत यासाठी आता त्यांनी आपले प्रयत्न आणखी तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. अशा सर्व लोकांना ९६-५४-९५८-८१६ आणि/किंवा ०११- २४३६८८०० वर एजन्सीला कॉल करून माहिती सामायिक करण्याचे आवाहन एनआयएने केले आहे", असे एनआयएने म्हटले आहे.

# शाळकरी मुलांना घेऊन जाणाऱ्या गाडीची ट्रकला धडक
## भीषण अपघातात चालकासह ६ विद्यार्थ्यांचा मृत्यू

**पटियाला, दि. ८ वृत्तसंस्था**

पंजाबमधील पटियाला जिल्ह्यात भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. पटियालामधील सामना रोडवर शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या एका वाहनाचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात शाळकरी मुलांना घेऊन जाणाऱ्या वाहन चालकासह ७ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर एक विद्यार्थी गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे पंजाबमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

शाळकरी मुलांना घेऊन जाणारी गाडी जात असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या टिप्पर ट्रकने या विद्यार्थ्यांच्या वाहनाला जोराची धडक दिली. समोरासमोर झालेल्या या भीषण अपघातात ६ शाळकरी विद्यार्थ्यांचा आणि विद्यार्थ्यांच्या वाहन चालकाचा जागीच मृत्यू झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

तसेच या घटनेत जखमी झालेल्या एका विद्यार्थ्याला गंभीर अवस्थेत जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात (आयसीयू) उपचार सुरु असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. दरम्यान, टिप्पर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. या संपूर्ण घटनेचा तपास पोलिसांनी सुरु केल्याची माहिती सांगण्यात आली आहे.

# पाकिस्तान धास्तावले
## पीएसएलचे 10 सामने कराचीत हलवले

**कराची, दि. ८ वृत्तसंस्था**

भारताने केलेल्या हवाई हल्ल्याचा धसका पाकिस्तानने घेतला आहे. आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने पाकिस्तान सुपर लीगच्या दहाव्या हंगामातील उर्वरित सर्व सामने कराचीत हलवण्याचा निर्णय घेतला आहे. गद्दाफी स्टेडियम येथे झालेल्या आपत्कालीन बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला पीएसएल फ्रँचायझी मालक आणि सुरक्षा दलांचे अधिकारी प्रतिनिधी उपस्थित होते.

पाकिस्तान सुपर लीग ही स्पर्धा महत्त्वाच्या टप्प्यावर असून, संभाव्य सुरक्षेच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे पीसीबीने म्हटले आहे. सर्वांशी सल्लामसलत करून कराचीत उर्वरित सामने खेळवण्याचे ठरवले आहे. या निर्णयामुळे आज रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमवर होणारा कराची किंग्ज आणि पेशावर झल्मी यांच्यातील २७ वा सामना रद्द करण्यात आला असून, तो कराचीत नव्याने नियोजित केला जाणार आहे. 'पीएसएल'चा अंतिम सामना १८ मे रोजी खेळला जाणार आहे.

# निवडणूक आयोगामार्फत २३०० पेक्षा अधिक क्षेत्रीय निवडणूक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

**नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था**

भारत निवडणूक आयोगाने (ईसीआय) तमिळनाडू आणि पुद्दुचेरी येथील क्षेत्रीय निवडणूक अधिकाऱ्यांना त्यांच्या स्थानिक तमिळ भाषेत प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतला. दिल्ली येथील इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट (आयआयआयडीईएम) येथे आयोजित या प्रशिक्षणात २६४ बीएलओ पर्यवेक्षक, १४ ईआरओ, २ डीईओ आणि इतर अधिकारी असे एकूण २९३ अधिकारी सहभागी झाले होते.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी या प्रशिक्षणाचे उद्घाटन केले. ते म्हणाले, बीएलओ हे निवडणूक आयोगाचे मतदारांसोबतचे पहिले संपर्कबिंदू असून, मतदारयादी अचूक आणि अद्ययावत ठेवण्यामध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. गेल्या काही आठवड्यांत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांमधून आतापर्यंत सुमारे २३०० अधिकाऱ्यांना लाभ झाला आहे. दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम बीएलओ आणि इतर निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी व्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाचा भाग असून, पुढील काही वर्षांत देशभरातील एक लाखांहून अधिक बीएलओंना प्रशिक्षण देण्याचे आयोगाचे उद्दिष्ट आहे.

बीएलओ पर्यवेक्षकांना फॉर्म ६,७ व ८ भरताना अचूकता राखण्यासाठी इंटरॲक्टिव सेशन्स, भूमिका आणि आयटी सोल्यूशन्स वापरण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. हे बीएलओ पर्यवेक्षक विधानसभा स्तरावरील मास्टर ट्रेनर्स म्हणून इतर बीएलओंना प्रशिक्षण देतील. प्रशिक्षणात सहभागी अधिकाऱ्यांना अंतिम प्रकाशित मतदार यादीविरुद्ध प्रथम व द्वितीय अपील करण्याच्या तरतुदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# रोहित शर्माची कसोटी निवृत्तीः चाहत्यांनी बीसीसीआयकडे दाखवले बोट

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

भारताचा स्टार फलंदाज रोहित शर्माने बुधवारी कसोटी क्रिकेटला अलविदा केला. रोहित शर्माने तडकाफडकी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्याने सर्वांनाच धक्का बसला. आयपीएल २०२५ नंतर इंग्लंड दौऱ्यात तो ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेचे नेतृत्व करेल, अशी अपेक्षा होती. परंतु, या आगामी मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर होण्याआधीच त्याने मोठा निर्णय घेतला. आता सोशल मीडियावर चाहत्यांकडून आरोप केला जात आहे की, रोहितने निवृत्ती जाहीर करण्याआधीच त्याला कसोटी कर्णधारपदावरून हटवण्यात आल्याचे सांगण्यात आले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताला लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावा



लागले. या मालिकेत रोहित शर्माला काही खास कामगिरी करता आली नाही. त्यानंतर रोहित शर्मा लवकरच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करेल, अशा बातम्या येऊ लागल्या. मात्र, त्यावेळी रोहितने निवृत्तीचे वृत्त फेटाळले. अखेर बुधवारी रोहित शर्माने इंस्टाग्राम स्टोरी शेअर करून निवृत्तीची घोषणा केली.

कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करताना रोहित शर्मा म्हणाला की 'भारताच्या कसोटी संघाचे प्रतिनिधित्व करणे माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. गेल्या काही वर्षांपासून मिळालेल्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल धन्यवाद. मी एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत राहीन', असे त्याने म्हटले. ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉर्डर- गावस्कर ट्रॉफीमधील चौथा कसोटी सामना रोहित शर्माच्या कसोटी कारकिर्दीतील शेवटचा सामना ठरला, जो भारताने गमावला होता.

रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर सोशल मीडियावर चाहत्यांकडून अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. रोहित शर्माच्या घोषणेच्या १ तास आधी बीसीसीआयने त्याला कर्णधारपदावरून हटवण्यात आल्याची माहिती दिली. त्यानंतर रोहित शर्माने निवृत्तीची घोषणा केली, असे रोहितचे चाहते बोलत आहेत. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाही.

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313